# माणूस

शनिवार
४ मार्च १९७२
पन्नास पैसे




" सदसद्विवेकबुद्धि ? हे काय नवीन काढलंत आणि निवडणूक ऐन तोंडावर आली असताना ? . . . . . "

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ४ मार्च १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | चाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार....**

□ २६ फेब्रुवारीचा अंक वाचला. त्यातली 'वीज' वाचली. सुन्न झालो. एकीकडे काँग्रेसच्या नेत्यांना लोकशाही, समाजवाद, भारतीय परंपरा, गरिबी हटाव, कसेल त्याची जमीन या घोषणा देऊन घशाला कोरड पडावी आणि दुसरीकडे—पंचवीस वर्षे लोकशाही नांदत असलेल्या या देशात—क्षुल्लक कारणासाठी एका आदिवासीला घशाला कोरड पडेपर्यंत वीज दिली जावी आणि या दोन्ही परस्परविरोधी घटना एकाच वेळी वर्तमानपत्रांत वाचण्याचे आमच्या नशिबी यावे, हे खरे आमचे दुर्दैव. सर्वच विचारापलीकडचे आहे.

२५ फेब्रुवारी, १९७२

रामचंद्र भिंगारे,
श्रीरामपूर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अरुण गोसावी

# मुंबई वार्ता

# एका सुधारलेल्या बेटावरची मागासलेली पत्रसृष्टी

मुंबईपासून सुमारे पाचशे मैल पश्चिमेला अरबी समुद्रात एका नव्या चिमुकल्या बेटाचा नुकताच शोध लागला. आतापर्यंत हे द्वीप आपल्याला जरी अज्ञात असले तरी इतर जगासारखीच येथल्या लोकांनीही प्रगती केली आहे असे लक्षात आले आहे. संस्कृती, विज्ञान आदी बाबतीत तर या द्वीपवासियांनी घोडदौड केलेली आहेच. पण त्याचबरोबर राज्यकारभार आणि राजकारण या बाबतीत त्यांनी जी नेत्रदीपक प्रगती केली आहे, ती खरोखरच आश्चर्यकारक आहे. लोकशाहीचा उत्कृष्ट अविष्कार तिथे पहावयास मिळतो; ओघानेच निवडणुकाही आल्या आणि निवडणुक प्रचारही आलाच.

परवा हिंडता हिंडता अचानक आमची बोट या चिमुकल्या द्वीपाच्या किनाऱ्याला लागली. आणि कुतुहल म्हणून या नव्या जगाचा फेरफटका करण्याचा बेत केला. बंदरावरच्या एका अधिकाऱ्याला पैसे चारून कसाबसा आत शिरण्याचा परवाना मिळवला. आणि मग लक्षात आले, की आत स्थानिक निवडणुका चालू आहेत. कारण जिकडे पहावे तिकडे पोस्टर्स आणि घोषणांचा सुकाळ. भितींवर खिडक्यांवर एवढेच काय रस्त्यावरील रहदारी दर्शविणाऱ्या पाट्यांवर, नकाशांवरही पोस्टर्स चिकटवलेली. जिकडे तिकडे कर्णे घेऊन लोक हिंडताहेत. पोस्टर्स आणि घोषणांच्या बाबतीत त्या लोकांनी मुंबईसारखीच प्रगती केल्याचे पाहून कौतुक वाटले.

पुढाऱ्यांच्या भाषणांची फारच कटकट होऊ लागली तेव्हा परतलो. येताना तेथील एक वृत्तपत्र घेऊन आलो. वृत्तपत्र आणताना पुन्हा तिथल्या बंदरावर चिरिमिरि द्यावी लागलीच. वृत्तपत्रात तेथील एका मतदार संघाविषयी, तेथल्या उमेदवारांविषयी सविस्तर माहिती आहे. वृत्तपत्र वाचून मात्र एक असे मत झाले, की तेथील पत्रसृष्टीने मात्र फारशी प्रगती केलेली नाही. वार्ताहर अगदीच बुद्दू

पृष्ठ ५३ वर



# मुख्यमंत्रिपदाची मागणी मराठवाड्याने करताच त्याला प्रादेशिकवादाचे स्वरूप का यावे ?

## निवडणुकीच्या ऐन तोंडावर शंकरराव चव्हाण यांची सडेतोड मुलाखत

प्र. : नुकतेच आपण मराठवाड्याचा दौरा करून आला आहात. प्रचार मोहीम एकूण कशी काय वाटली ?

उ. : प्रचार मोहीम चांगली चालली आहे. बऱ्याच ठिकाणी ती चांगलीच प्रभावी झाली आहे. प्रचार मोहिमेला आवश्यक ती गती (टेम्पो) येऊ पहात आहे.

प्र. : नवकाँग्रेसला मराठवाड्यात साधारणपणे किती जागा मिळतील असे आपल्याला वाटते ?

उ. : मराठवाड्यातील एकूण ४३ जागांपैकी जवळजवळ ३८ जागा तरी माझ्या पक्षाला निश्चितच मिळतील.

प्र. : गेल्या निवडणुकीत मराठवाड्यातील किती जागा विरोधी पक्षाने जिंकल्या होत्या ? आज विरोधी पक्षाची तेथे काय अवस्था आहे ?

उ. : ४३ पैकी सुमारे १० जागा गेल्या वेळी विरोधी पक्षांकडे गेल्या होत्या. यावेळी विरोधी पक्षाने फारसा जोर धरला आहे अशी परिस्थिती मला वाटली नाही. प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्यानंतर तर परिस्थितीत फारच फरक पडला आहे. त्यामुळे ४३ पैकी ३८ जागा मिळतील असे म्हटले असले तरी त्यात काही सुधारणा

होण्याची खूपच शक्यता असून त्यापेक्षा अधिक जागाही आम्ही जिंकू शकू.

प्र. : विरोधी पक्षाचा प्रभाव कमी होणे ही लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर बाब आहे असे नाही वाटत ?

उ. : लोकशाहीत विरोधी पक्षाचे महत्त्व फार आहे. पण यात पॉझिटिव्ह व निगेटिव्ह आस्पेक्टस् आहेत. पॉझिटिव्ह आस्पेक्टचा भाग पाहता स्थिर सरकार असणे ही निकडीची गोष्ट आहे. इंदिराजींच्या नेतृत्वाखाली समाज-अभिसरणाची प्रक्रिया सुरू झाली. बँकांचे राष्ट्रीयकरण, घटनादुरुस्ती यांसारखी महत्त्वाची पावले उचलली गेली. यातूनच सामाजिक व आर्थिक बदलाचा अपेक्षित असा चांगला पाया घातला गेला. इंदिराजी जे बोलतात ते करून दाखवितात असा लोकांत विश्वास निर्माण झाला आहे. म्हणूनच मध्यावधी निवडणुकीत नवकाँग्रेसला भरघोस विजय मिळवता आला आणि त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या बाजूनेच चांगले बदल मध्यवर्ती शासनाकडून घडले. ती एक जमेची बाजू आहे.

याउलट निगेटिव्ह आस्पेक्ट पाहू या. आपल्या देशात अजूनही जबाबदार विरोधी पक्ष अशी प्रतिमा विरोधी पक्षाने तयार केलेली नाही. विरोधी पक्षात तशी ती भावना नाही. काँग्रेस विरोध हाच विरोधी पक्षाचा एकमेव कार्यक्रम. सामाजिक व आर्थिक कार्यक्रमांवर विरोधी पक्षाचा भर व त्याकरिता जिद्दीने प्रयत्न करण्याची तयारी याचा अभाव आहे. बड्या आघाडीचाही मतदारांवर ' बॅड इंम्पॅक्ट ' आहे. मतदार जागरूक आहे. तो हे सारे ओळखू शकतो. विरोधाकरिता विरोध व नकारात्मक भूमिका सोडल्यास त्याचा मतदारांवर चांगला परिणाम होऊ शकेल. मला वाटतं, यामुळेच विरोधी पक्षाचा प्रभाव कमी झाला आहे.

प्र. : काँग्रेसमधील बंडखोरीच्या व त्याविरुद्ध होत असलेल्या शिस्त-भंगाच्या कारवाईच्या बातम्या येत आहेत. ए. आय. सी. सी. चे सरचिटणीस श्री. चंद्रजीत यादव यांनीही प्रदेश काँग्रेस समित्यांना सूचनापत्रके पाठवून ' पक्षश्रेष्ठींच्या पूर्वानुमतीची वाट न पाहता तात्काळ कारवाई करा. ' असा आदेश दिला आहे. या पार्श्वभूमीवर माझा प्रश्न असा आहे, की मराठवाड्यात बंडखोरी खरोखरीच आहे का ? असल्यास ती कशा प्रकारची आहे व त्याची साधारणपणे कारणे काय ?

उ. : नासिक, नगर, कोल्हापूर, औरंगाबाद व बीडमध्ये थोडीफार बंडखोरी आहे. पण त्या बंडखोरीचे स्वरूप संघटित नाही. नाराजी आहे. तिकीट वाटपाच्या प्रश्नावर तशी ती नेहमीच असते. त्यात अनेक वेळा विरोधी पक्ष चिथावणी देऊन भर घालीत असतात. बंडखोरी असली, तरी मतदार देशाचा व राज्याचा विचार जरूर करतात. राज्यकारभार कोणाच्या हाती दिला पाहिजे याचा लोक विचार करीत नाहीत असे का समजावे ?

प्र. : शिस्तभंगविरोधी कारवाईच्या बडग्याने बंडखोरी थांबवता येईल की त्याचे परिणाम उलटेच होतील ? दुसरं म्हणजे बंडखोरांविरुद्ध कारवाई करण्याची आवई उठते पण प्रत्यक्षात विशेष काही केले जात नाही. तेव्हा बंडखोरी करायला हरकत नाही असा काही काँग्रेसजनांचा समज झाला असल्याचे त्यांच्याशी बोलताना अनेक वेळा आढळून येते. याचा संघटनेवर काय परिणाम होईल असे आपल्याला वाटते ?

उ. : कारवाई केली जाते ही बाब वातावरणात आणणे हे निवडणुकीपूर्वी तरी आवश्यकच आहे. शिस्तभंगाच्या इलाजामुळे काही परिणाम बरे होतील. बंडखोरीचे बरेच प्रकार थांबतील. इतरांना यापासून प्रोत्साहन मिळते ते थांबेल. नाराजीतून बंडखोरी उद्भवते पण कालांतराने त्यांच्यात 'पार्टीलाईन'ही येतच असते. ज्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यात येते त्या व्यक्तीचे समाजात व पक्षात वजन काय, स्थान कोणते यावर संघटनेवर होणाऱ्या परिणामांचे स्वरूप नेहमी अवलंबून असते. काही जरी झाले तरी शिस्तभंगाचा इलाज झाला पाहिजे. एकदा तिकिटे दिल्यानंतर सारे मतभेद विसरून पक्षाचे काम केले पाहिजे यावर माझा ठाम विश्वास आहे.

प्र. : शुगर सिंडिकेटबद्दल आपल्याला काय म्हणायचे आहे ?

उ. : शुगर सिंडिकेटची समाजावर पकड आहेच पण इतरही हितसंबंधितांची पकड समाजावर आहे. समाजाची प्रातिनिधिक म्हणून ती काँग्रेससंघटनेवरही आहे. अनेक प्रयत्न करूनही ही पकड अजूनही ढिली झालेली नाही. ती ढिली वा नष्ट करायची असेल तर 'प्रोग्रॅमॅटिक अॅप्रोच' घेणे अत्यावश्यक आहे. अशा 'अॅप्रोच'च्या आड येणाऱ्यांविरुद्ध किंवा त्याविरुद्ध कारवाया करणाऱ्यांविरुद्ध कडक उपाय योजना केलीच पाहिजे. म्हणूनच काँग्रेसचे शुद्धीकरण करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

प्र. : ए. आय. सी. सी. तर्फे पार्लमेंटरी बोर्डावर सर्वश्री. सावनेकर व देशमुख यांची नेमणूक झाल्यानंतर श्री. तुळशीदास जाधव म्हणाले, 'दोन खिडक्या उघड्या झाल्या आहेत, महाराष्ट्रात आता मोकळी हवा खेळेल ? तर आपण म्हणालात 'प्रधानमंत्र्यांचे रिट (Writ) महाराष्ट्राला लागू झाले आहे.' या घटनेची जी प्रतिक्रिया झाली त्यामुळे संघटना म्हणून एम. पी. सी. सी. वर काही परिणाम झाला किंवा तसा तो होईल असे आपल्याला वाटते का ?

उ. : अनेकांना ही गोष्ट पसंत पडली आहे असे त्यांच्या वागणूकीवरून तरी दिसत नाही. या घटनेविरुद्ध अनेकांचा थोडासा रागही आहे. दिल्लीचे तुम्ही ऐकता आहात हे काही बरोबर नाही असे अनेकांना वाटते. प्रधानमंत्र्यांचे देशातले नेतृत्व महाराष्ट्रात वेगळे का मानले जावे ? त्यांचे नेतृत्व महाराष्ट्रातदेखील मोकळ्या मनाने मान्य व्हावे असे वातावरण निर्माण होणे अगत्याचे आहे.

एम. पी. सी. सी. ही ए. आय्. सी. सी. ची प्रांतिक बॉडी आहे. त्यामुळे अशी

नेमणूक होणे हे एम. पी. सी. सी. विरुद्ध आहे असे का मानले जावे? प्रत्येक प्रांतिक बॉडी जर ए. आय्. सी. सी. पासून पूर्णपणे स्वायत्त असल्याचे मानू लागली तर मग ए. आय. सी. सी. चे स्वरूपच बदलावे लागेल. काँग्रेस संघटनेचे स्वरूप हे फेडरल पद्धतीचे नाही.

सर्वांना समजावून, सामावून घेऊन अॅडजस्टमेंट करायची ही महाराष्ट्राची आजवरची परंपरा. यावेळी ही अशी थोडी वेगळी भूमिका घेतली गेली त्यामुळे त्याची प्रतिक्रिया होणे हे तसे स्वाभाविक होते. प्रधानमंत्र्यांना या देशाचे नेतृत्व करायचे आहे. लोकांच्या आशाआकांक्षाना मूर्त स्वरूप द्यायचे आहे. देशाची आर्थिक व सामाजिक घडी बदलायची आहे. त्या दृष्टीने त्यांच्या विचारांशी पूर्णपणे सहमत असलेली त्यांच्या विश्वासातील माणसे राज्यातून असणे आवश्यक नाही का? एकीकडे त्यांचे नेतृत्व मानायचे पण ते महाराष्ट्रात वाढूनये असा प्रयत्न करणे योग्य नाही असे मला वाटते. या दोन्ही गोष्टी एकत्र कशा येऊ शकतात?

प्र. : जमीनधारणा मर्यादेबाबत आपले विचार काय आहेत?

उ. : जमीन धारणा मर्यादा कमी केली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. महाराष्ट्रात जमिनीची भूक फार मोठया प्रमाणात आहे. अनेकांकडे उपजीविकेचे दुसरे कोणते साधन नाही. काही लोकांकडे भरपूर जमीन तर काही जण भूमिहीन. ही परिस्थिती सामाजिक न्यायाला धरून होणार नाही. जमीन धारणा असो वा शहरी मालमत्ता वा नोकऱ्या असोत साऱ्यांबाबत हे व्हायला पाहिजे. सामाजिक न्याय हा प्रत्येकाला मिळालाच पाहिजे. औद्योगिकरणाने हा प्रश्न सोडविण्यात आला तर चांगलेच. पण मला तरी तसे होत आहे असे दिसत नाही. प्रत्येकाला स्वाभिमानाने जगता आले पाहिजे असे वाटते. जमीन धारणामर्यादेमुळे हा सारा प्रश्न सुटेल असे नाही, पण काही प्रमाणात का होईना, अगदी २५ टक्के या प्रमाणात जरी हा प्रश्न त्यामुळे सुटला तरी लोकांत चांगलाच विश्वास निर्माण होण्यास त्याची मदत होणार आहे. कुठेही संपत्तीचे केंद्रीकरण नसावे. त्याचे जास्तीत जास्त वाटप होणे आवश्यक आहे.

प्र. : शहरी मालमत्ताधारणा मर्यादा ही जमीनधारणा मर्यादेबरोबरच यावी असे आपल्याला वाटते का?

उ. : या दोन्ही गोष्टी एकाचवेळी झाल्या तर फारच चांगले. जमीनधारणा-मर्यादा व शहरी मालमत्ताधारणामर्यादा या प्रश्नांवर सध्या शहरी लोकसंख्या व ग्रामीण लोकसंख्या यांच्यात जी कृत्रिम दरी निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे ती यामुळे टाळता येईल. पण ते तसे करणे शक्य न झाल्यास याचे निमित्त करून जोपर्यंत शहरी मालमत्ता धारणेवर मर्यादा येत नाही तोपर्यंत ती जमीनी-बाबत लागू केली जाऊ नये किंवा त्याचे उलट देखील. म्हणून ही उपाय योजना पुढे ढकलली जाऊ नये असे वाटते.

प्र. : विकासात मराठवाडा मागे आहे हे एक कारण तर मुख्यमंत्री-पदाबाबत नागपूर करार झाला आहे हे दुसरे कारण. यापैकी कोणत्या कारणामुळे प्रादेशिक वा विभागीय अस्मिता निर्माण झाली असे आपल्याला वाटते का ? त्याचप्रमाणे मुख्यमंत्रीपद एखाद्या विभागाकडे गेल्यामुळेच त्या विभागाचा विकास होऊ शकतो का ?

उ. याबाबत या दोन्हीही मुद्यांचा संबंध येतो, पण यातही भर द्यावा लागेल तो नागपूर करारावरच. नागपूर करारामागे उदात्त भूमिका होती. एकसंध महाराष्ट्र निर्माण करण्याचीच ती भूमिका व भावना होय. महाराष्ट्राच्या विकासात बरो-बरीच्या नात्याने वागविले जात नाही अशी मनोभूमिका तयार होऊ नये यासाठीच ही तजवीज होती. यातूनच भावनिक एकात्मता साधली जाण्याचा महत्त्वाचा भाग साधला जाणार होता. मागासलेल्या विभागांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनेही हे महत्त्वाचे होते. मुख्यमंत्री कोणत्याही भागातील असला तरी तो राज्याचा मुख्यमंत्री असतो. पण पाळीपाळीने मुख्यमंत्रीपद नागपूरकराराप्रमाणे सामंजस्याने निरनिराळ्या विभागांकडे जाण्याचा संकेत पाळता आला तर भावनिक ऐक्याच्या दृष्टीने ते फारच महत्वाचे ठरेल. विदर्भाबाबत हेच झाले, की दादासाहेब कन्नमवार यांच्या मृत्यूनंतर विदर्भाची टर्म पूर्ण झाली नाही, यावर जोर दिला गेला होता. त्यावेळीही मुख्यमंत्रीपदाची मराठवाड्याची मागणी होतीच. ६७ सालीही मराठ-वाडा याबाबत डावलला गेला होता. मराठवाड्याने ही मागणी करताच त्याला प्रादेशिकवादाचे स्वरूप का यावे ?

प्र. : आपल्यावर काही अन्याय झाला आहे अशी मराठवाड्यातील जनतेची भावना आहे का ?

उ. : आपल्यावर अन्याय झाला आहे, अशी मराठवाड्यातील जनतेत भावना आहे. ६७ सालीच मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळायला पाहिजे होते. ते न मिळाल्याने लोकात अशी भावना निर्माण झाली. त्याचप्रमाणे विकासातही मराठ वाडा मागे पडल्याने ती तशी निर्माण झाली.

प्र. : विभागीय वा प्रादेशिक अस्मितेवर मुख्यमंत्रीपद ठरवले जावे असे आपल्याला वाटते का ?

उ. : विभागीय अस्मितेवर मुख्यमंत्रीपद ठरावे असे नाही. पण 'जन्टलमेन्स अॅग्रीमेंट' पाळले जावे. असे होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रनिर्मितीच्या वेळी जी आश्वासने दिली गेली होती ती पाळली गेली पाहिजेत एवढाच याचा अर्थ.

प्र. : मुख्यमंत्रीपदाचा वाद सध्या कोणत्या अवस्थेत आहे ?


उ. : प्रधानमंत्र्यांकडे हा प्रश्न सोपवल्यामुळे मराठवाड्याला न्याय मिळेल यावर लोकांचा भरवसा आहे. यावर चर्चा चालते पण अतिरेक नाही. मात्र लोकांत ही भावना जरूर आहे. □

---

मुलाखत : विजय वैद्य

---

# कामगार डायरेक्टर!



## कामगार संघटनांची वाताहात करणारे नवे प्रलोभन की समाजवादाचे नवे पर्व ?

**केदार जोशी**

काही सरकारी कारखान्यांतील संचालक मंडळावर (Board of Directors) कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचा प्रतिनिधी नेमण्याची सरकारने घोषणा केली आहे. असहाय कामगारांची वाटेल तशी पिळवणूक होण्याच्या काळातून, अनेक संघर्षांनंतर कामगारांच्या संघटित शक्तीने केवढी मजल मारली आहे, त्याची ही एक निशाणीच आहे. सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यात आदर्श मालक (Ideal employer) म्हणून भूमिका वठविण्याची सरकारची इच्छा आहे. तसेच औद्योगिक अशांततेमुळे सरकारी कारखान्यांचे होणारे नुकसान (पर्यायाने राष्ट्राचेच नुकसान) कमी करावे हा सरकारचा हेतू आहे, म्हणून ही योजना सत्वर अंमलात आणण्याचे सरकारने ठरवले आहे. अर्थात इतर अनेक नवीन उपक्रमांप्रमाणे ही कल्पनासुद्धा आम्ही परदेशातून आयात केली आहे. इंग्लंड, जर्मनी, युगोस्लाव्हिया वगैरे देशांत या योजनेस अपयश आले असले, तरी तसे अपयश आपल्या देशात येणार नाही अशी आकांक्षा सरकार बाळगून आहे. कामगार व मालक यांच्या संबंधांचा जरा आढावा घेतल्यास ही आशा फलद्रूप होईल असे मानण्यास कितपत आधार आहे ते पाहूया.

कारखान्यांच्या दैनंदिन कारभारात सहकार्य मिळवण्याचे दृष्टीने Works Committee, Production Committee, Canteen Committee, Grievence Committee वगैरे कमिट्यांचे उपक्रम सुरू झाले, त्याला बरीच वर्षे होऊन गेली. त्या नंतर १९५७ साली, सरकारने ' जॉइंट मॅनेजमेंट कौन्सिल 'च्या योजनेचा प्रथम पुरस्कार केला. या योजनेचे चार उद्देश होते.

१ : कामगारांच्या राहण्याच्या व कामाच्या परिस्थितीत सुधारणा करावी.

२ : कारखान्याच्या दैनंदिन कारभारात कामगारांनी लक्ष घालून त्यात सुधारणा सुचवाव्यात

३ : व्यवस्थापक व कामगार यांच्यात संवाद (Dialogue) सुरू करावा.

४ : व्यवस्थापनाच्या खालच्या स्तरावर कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करावे. १९५९ साली फक्त आठ सरकारी कारखान्यांत अंमलात असलेली ही योजना १९७० सालापर्यंत ३३ सरकारी व ५४ खाजगी कारखान्यात राबवली जात होती.

या योजनेचा अभ्यास केल्यास काय दिसते ?

तर १२ प्रमुख सरकारी कारखान्यांतील या योजनेचा अभ्यास करून मजूर खात्याने असा निष्कर्ष काढला आहे, की ही योजना आपली उद्दिष्टे गाठण्यात अपयशी झाली आहे.

अर्थात व्यवस्थापक व कामगार यांचा एकमेकाबद्दलचा अविश्वास या अपयशास कारण आहे हे उघडच आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारने जाहीर केलेल्या ('Workers' representative on the Board of Directors) डायरेक्टर बोर्डावर कामगार प्रतिनिधी या योजनेचा विचार केला पाहिजे.

ही योजना लागू करण्यासाठी सरकारने काही निकष ठरवले आहेत ते असे.

१ : कारखान्यात, प्रामुख्याने (Predominantly) कामगारांनीच चालवलेली, मान्यता मिळालेली युनियन असली पाहिजे.

२ : डायरेक्टर नेमायची ती व्यक्ती प्रत्यक्ष कारखान्यात कामास असली पाहिजे.

३ : कारखान्यात गेली काही वर्षे औद्योगिक शांतता असली पाहिजे.

४ : डायरेक्टर म्हणून कोणत्याही शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता नाही.

५ : युनियनने तीन नावांचे पॅनेल सुचवावे, नंतर त्यांपैकी एकाची किमान दोन वर्षांसाठी सरकार नेमणूक करील.

६ : इतर डायरेक्टर्स प्रमाणेच या कामगार डायरेक्टरला भत्ता व सवलती मिळतील, परंतु एरवी त्यास आपले नेहमीचे काम करावे लागेल.

७ : युनियनची मान्यता काढून घेतल्यास नवीन मान्य युनियनला पहिल्या प्रतिनिधीऐवजी नवीन प्रतिनिधी पाठवण्याची संधी मिळेल.

या योजनेमुळे संबंधित कारखान्यातील कामगार संघटनेवर फार दूरगामी दुष्परिणाम होतील हे निश्चित. कामगार संघटनांत दुहीची बीजे पेरून त्यांचा नाश करण्यासाठी या पेक्षा चांगली योजना तयार करता येणार नाही असे खात्रीने म्हणता येईल. पुण्याच्या परिसरातील एका सरकारी कारखान्यास ही योजना लावण्याची सरकारने घोषणा केल्यानंतर तेथे घडलेल्या घटना पुरेशा बोलक्या आहेत.

## एका सरकारी कारखान्यातील अनुभव

मान्यता असलेली कामगार युनियन या कारखान्यात गेली कित्येक वर्षे काम करीत आहे. सारासार विचार जागृत ठेवून काम करणारी, अनेक वेळा व्यवस्थापकांच्या अकार्यक्षमतेकडे संबंधित मंत्र्यांचे लक्ष वेधणारी अशी ही युनियन आहे. गेल्या वर्षी–१९७१–साली झालेल्या निवडणुकीत काही व्यक्ती प्रचंड बहुमताने निवडून आल्या होत्या. त्या व्यक्ती लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेल्या होत्या असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. आणि एखादे अनपेक्षित संकट यावे तसा सरकारचा आदेश आला, की डायरेक्टरची नेमणूक करण्यासाठी तीन नावांचे पॅनेल सुचवावे. अर्थात या लोकप्रिय नेत्यांनासुद्धा या आदेशातील संकटाची जाणीव झाली नाही. बिचारे समजत असतील, की आता आपले कार्यक्षेत्र वाढेल, महत्त्व वाढेल व अनेक वर्षांची महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल. कार्यकारिणीची बैठक झाली, तीन नावांचे पॅनेल तयार झाले. आता ती नावे सरकारला फक्त कळविण्याचेच बाकी राहिले. पण एकाएकी वादळ आले व त्याने एकेकाळच्या अत्यंत लोकप्रिय नेत्यांना युनियनच्या कारभारातून हुसकावून लावले.

कारखान्यात या विषयावर चर्चेचे रण माजले व संघटनेतील तीव्र मतभेद वर उफाळून आले. कार्यकारिणीचा निर्णय सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी मांडावा लागला. त्या सभेत अनेक मुद्दे मांडले गेले व कार्यकारिणीला आपला निर्णय स्थगित करावा लागला. उपस्थित झालेले मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

१ : पॅनेल सुचवून त्यातील एकाची नेमणूक सरकार करणार हे आम्हास अमान्य आहे. कामगार फक्त एकच नाव सुचवतील व ते सरकारने मान्य केले पाहिजे. ते शक्यतो निवडणुकीने ठरवले जावे.


२ : डायरेक्टर पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीस परत बोलावण्याचा अधिकार युनियनला असला पाहिजे.

३ : युनियनच्या निवडणुका दर वर्षी होतात. तेव्हा नेमणूक झाल्यानंतरच्या वर्षी डायरेक्टरच्या विरोधी गट निवडणुकीत विजयी झाला, तर डायरेक्टर खऱ्या अर्थाने कामगारांचा प्रतिनिधी असणार नाही.

४ : या डायरेक्टरचे कार्यक्षेत्र व अधिकार अधिक स्पष्ट होणे आवश्यक आहे.

५ : बोर्ड मीटिंगमधील चर्चेबाबत त्यास गुप्तता पाळावी लागेल काय ? त्यावेळी सहभागित्वाचे खरे समाधान कामगारास मिळणार नाही. उलट तेथील चर्चेचा उपयोग त्याने कामगार संघटनेच्या कार्यात केल्यास बोर्डाच्या कामकाजातील मोकळेपणा नष्ट होऊन, एकप्रकारचे संशयाचे वातावरण निर्माण होईल. बोर्डाच्या कार्यक्षमतेवर अशा संशयाचे फार वाईट परिणाम होतील.

६ : कामगार संघटनेतील, मानाला हपापलेली एखादी व्यक्ती हे डायरेक्टर पद मिळवून त्याचा स्वतःच्या स्वार्थी लाभासाठी गैर फायदा घेईल.



दोन भिन्न पातळ्यांवरील
चर्चेला तसा फारसा अर्थ नाही.

७ : या पूर्वी प्रत्यक्ष कारखान्यातील कामगारांचा नसला, तरी कामगार वर्गाचा प्रतिनिधी (जसे रिझर्व बँकेच्या डायरेक्टर पदावर एस. एम. यांची नेमणूक झाली) बोर्डावर होताच.. तो एकटा प्रतिनिधी विशेष काही करू शकत नसे.

सभेत वर उल्लेख केलेले व आणखीही इतर मुद्दे मांडले गेले. ज्या नेत्यांनी पॅनेल सुचवण्याचे ठरवले होते, त्यांना या चर्चेत माघार घ्यावी लागली व आपला निर्णय स्थगित ठेवावा लागला. परिणाम म्हणून जवळ जवळ संपूर्ण कार्यकारिणीने राजीनामा दिला. आता कारखान्यात नवीन निवडणुका होऊन नवीन माणसे अधिकारावर आली आहेत. त्यांनाही डायरेक्टर बोर्डावर कामगार प्रतिनिधी पाठवण्यासंबंधी निर्णय घ्यावयाचा आहे. लोकप्रिय अशा जुन्या नेत्यांची काय अवस्था झाली ती हे नवीन नेते विसरणे कठीण आहे. या प्रश्नावर आपलीही स्थिती त्यांच्यासारखी होणार नाहीना, अशी भीती त्यांच्या मनात आहे. लोकांना हवा असणारा कामगारनेता ही सुळावरची पोळी स्वीकारण्यास तयार नाही असे ऐकिवात आहे. तूर्त हा प्रश्न रेंगाळला आहे. डायरेक्टर बोर्डावर कामगारांचा प्रतिनिधी पाहिजे असा आजपर्यंत आग्रह धरणाऱ्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना, ते डायरेक्टरपद शाप आहे की वरदान आहे याबद्दल संभ्रम निर्माण झाला आहे हे नक्की. या योजनेतील अंगभूत अशा अनेक अडचणींची कामगार वर्गात जाणीव होत आहे. परंतु बेजबाबदार घोषणाबाजीमुळे, समाजवादाचा देखावा निर्माण करण्यासाठी तयार झालेले आजचे हे सरकार कोणत्याही अडचणींचा विचार करील हे आता असंभवनीय आहे. आज ना उद्या अनेक ठिकाणी कामगार डायरेक्टर नेमले जातील म्हणून कामगार संघटनेवरील होणाऱ्या दुष्परिणामांबरोबरच इतर परिणामांची माहितीपण येथे अस्थानी ठरणार नाही.

कारखान्याचे आर्थिक व्यवहार, पुढील वाढीसंबंधीचे धोरण वगैरे धोरणात्मक विषयांवर बोर्डाच्या मीटिंगमध्ये चर्चा होतात. इतर डायरेक्टर्स निरनिराळ्या विषयात तज्ज्ञ असतात. कोणत्याही विषयात तज्ज्ञ असलेल्या या नवीन सहकाऱ्यांशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार करणे त्यांना फार जड जाईल. कामगार डायरेक्टरला

बोर्डाच्या मीटिंगमध्ये, बहुमताबरोबर राहणे वा अल्पमतात असलेल्या विरोधी पक्षनेत्याप्रमाणे विरोध नोंदवणे एवढेच काम करता येईल. मध्यवर्ती सरकारचे एक समाजवादी मंत्री श्री. मोहन कुमारमंगलम यांनी हाच विचार मांडला आहे.

" The reason is that a director all said and done is only a member of the management in respect of decisions on major problems which are put before the Board. There will always, therefore, be a tendency for a worker director either to accept the point of view of majority of the Board, in which case the workers who have nothing else to do in the matter but to elect him to the Board may repudiate him, or he may become what I may call a leader of the opposition in the Board, which again takes us nowhere (Link Jan 26th, '72.)

या योजनेप्रमाणे कामगार डायरेक्टरला इतर अर्धवेळ (Part time) डायरेक्टर प्रमाणे भत्ते व सवलती मिळाल्या तरी इतर वेळी त्याने आपले नेहमीचे काम केले पाहिजे अशी अपेक्षा आहे. हे जवळ जवळ अशक्यच आहे. उदाहरणच घ्यायचे तर पुन्हा वर उल्लेख केलेल्या सरकारी कारखान्याचे घ्यावे लागेल. कामगार पुढारी होणे म्हणजे आपले काम न करण्याचा जणू काय एक परवाना आहे असा येथ समज आहे. अशा स्थितीत डायरेक्टर झालेली व्यक्ती आपले नेहमीचे काम करील हे खरे वाटत नाही. प्रत्यक्षात तो कामगारांशी डायरेक्टरच्या रुबाबात वागेल आणि बोर्डाच्या मीटिंगमध्ये, आपण डायरेक्टर आहोत हे विसरेल व कामगार पुढाऱ्याप्रमाणे वागेल.

डायरेक्टर बोर्डावर कामगार प्रतिनिधी नेमल्याने कामगार मालक संबंधात नवीन पर्व निर्माण होणार असल्याची खूप जाहिरात चालू आहे आणि समाजवादी मंत्री श्री. मोहन धारिया आपल्या परीने त्यास संधी मिळेल तेव्हा हातभार लावीत आहेत. नवीन पर्व नक्की निर्माण होईल. मात्र ते अधिक व नवीन समस्या घेऊन येईल. याला कारण म्हणजे या योजनेच्या प्रवर्तकांचे काही समज आहेत. ते कसे चूक आहेत ते पाहणे उद्‌बोधक ठरेल.

## संपाचा अधिकार ?

मालक अगर व्यवस्थापक आणि कामगार यांच्या हितसंबंधाचे विलिनीकरण केल्यास (Identity of Interest) त्यांच्यात अधिक सुसंवाद (Harmony) निर्माण होईल व अशा सुसंवादानेच सर्व प्रश्न सुलभतेने सुटतील. प्रत्यक्षात हे खरे नाही. काही प्रश्न हे संघर्षानेच सोडवावे लागतात हे खरे आहे. कामगारांचे हितसंबंध व कारखान्याच्या व्यवस्थापक वर्गाचे हितसंबंध हे पूर्णतया एकरूप होणे अशक्य आहे. अगदी पूर्णतः कामगारांच्या मालकीच्या कारखान्यातसुद्धा व्यवस्था-

पकाचे काम कोणाला तरी करावेच लागेल. त्या ठिकाणीसुद्धा कार्यक्षम संचालक व कामगार यांच्यात मतभेद निर्माण होणे नैसर्गिक आहे. (उदा. अगदी डाव्या विचारसरणीचा प्रचार करणाऱ्या Patriot सारख्या साप्ताहिकाच्या कचेरीत अलीकडेच संप झाले.) हे नैसर्गिक मतभेद कमी वा दूर करण्यासाठी योग्य अशा नियमांनी बद्ध पद्धतीने एकमेकांशी चर्चा करणे हा एकमेव सुसंस्कृत मार्ग आहे. या मार्गात अपयश आल्यास फक्त संघर्षाचाच मार्ग उरतो व लोकशाहीत तो राजमान्य आहे. परंतु फॅसिस्ट अगर कम्युनिस्ट हुकुमशाहीत सरकारला हा मार्ग बंद करावा लागतो. भारत सरकारचे एक मंत्री श्री. हनुमंतय्या यांनी असे मत व्यक्त केले आहे की 'कामगारांना व्यवस्थापनात सहभाग हवा असेल तर त्यांनी संपाचा अधिकार सोडला पाहिजे.' सरकारमधील जबाबदार अशा मंत्र्याचे हे मत आहे हे लक्षात घेता भावी धोक्याची जाणीव होईल.

अनेक वर्षांच्या संघर्षानंतर, मालकांनी घेतलेल्या निर्णयावर टीका करण्याचा वा ते बदलून घेण्याचा लोकशाही अधिकार कामगारांनी मिळवलेला आहे. हा अधिकार ज्यामुळे कमी प्रभावी होईल वा जाईल अशा गोष्टींचा कामगारांनी स्वीकार करणे म्हणजे फार मोठी चूक होईल. कारखान्याच्या व्यवस्थापनात निर्णय घेण्याची जबाबदारी व्यवस्थापकांनीच पार पाडली पाहिजे. त्या निर्णयात सहभागी होण्याने कामगार संघटनांचे एक शस्त्र Bargaining Power बोथट होण्याची भीती आहे.

कामगारास डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व दिल्याने कामगारांना सहभागाची (Sense of participation) जाणीव होते ही कल्पना Dignity of Labourच्या कल्पनेशी विसंगत आहे. कोणताही स्वाभिमानी कामगार अशा प्रतिनिधित्वास हपापलेला नाही. वास्तविक कोणत्याही क्षेत्रात आत्मीयतेची भावना कशामुळे निर्माण होते ही विचार करण्याची गोष्ट आहे. मनुष्याच्या जीवनात तो स्वतः, त्याचे कुटुंब, भोवतालचा समाज. व राष्ट्र ही चढत्या श्रेणीने महत्त्वाची अंगे असली पाहिजेत. तो काम करीत असलेला कारखाना हे त्या मानाने त्याच्या जीवनाचे एक गौण उपांग आहे. म्हणून एकादी व्यक्ती या गौण उपांगात किती समरस होईल हे जीवनातील महत्त्वाच्या अंगात त्यास कितपत समरसता आलेली आहे, त्यावर अवलंबून आहे. अशा व्यक्तीला त्याच्या कारखान्यातही ती समरसता व आत्मीयता कोणत्याही प्रलोभनाशिवाय मिळवता येते. या समरसतेची जरुरी जशी कामगारास आहे, तशीच किंवा त्याहून अधिक ती व्यवस्थापक वर्गास (विशेषतः सरकारी कारखान्यातील) आहे. याही बाबतीत सरकारी कारखान्यातील संचालकांची एक दोन उदाहरणे उद्बोधक होतील. सेवा निवृत्तीस एक दोन वर्षेच उरली असताना एका गृहस्थांची एका सरकारी कारखान्याच्या मॅनेजिंग डायरेक्टर पदावर नेमणूक झाली. नोकरीतला राहिलेला काळ विशेष त्रास न घेता सुखासीनपणे घालवण्याची त्यांना इच्छा होती. त्यामुळे प्रत्येक विषयात युनियनच्या

पुढाऱ्यांशी नमते घेणे व वाद टाळणे हे धोरण त्यांनी अंगिकारले आणि अशा प्रकारे व्यवस्थापनाच्या कार्यातील आपले सहभागित्व त्यांनी निरुपयोगी व निरुपद्रवी करून टाकले. त्याच कारखान्यात दुसरे मॅनेजिंग डायरेक्टर आले. त्यांची तऱ्हा आणखीनच निराळी होती. कंपनीला उत्पादनात काही सुधारणा करायची असली वा काही नवीन उत्पादन सुरू करण्याच्या योजना असल्या, की त्या योजनाना यांच्या कारकीर्दीत नेहमीच दडपले जात असे. आणखी एक मॅनेजिंग डायरेक्टर असे होते, की स्वतःच्या नातेवाईकांना किंवा जातीच्या व्यक्तींना बढत्या आणि नेमणुका देण्यासाठीच फक्त आपल्या अधिकाराचा उपयोग ते करीत. अशा व्यक्ती जेव्हा अधिकारावर असतात तेव्हा कामगारांना त्या कारखान्याबद्दल आत्मीयता वाटत नाही यात आश्चर्य कसले? एखाद्या कामगारास डायरेक्टर करण्याने ती कशी निर्माण होणार? तेव्हा व्यवस्थापकांनी कारखान्याच्या हिताशी समरस होण्याचीसुद्धा आज प्राथमिक गरज आहे. ती पुरी करणारे कार्यक्षम, निःस्वार्थ व न्यायबुद्धी जागृत असलेले व्यवस्थापक सरकारी कारखान्यात दिसू लागल्यास कामगारांच्या आत्मीयतेचा प्रश्नच राहणार नाही. अशा व्यवस्थापकांना कामगारांकडून उस्फूर्त सहकार्य मिळेल.


काव्यात्म प्रेमिकांच्या प्रेमपत्रांचे संकलन

## कुसुमानिल

प्रणयरम्य पार्श्वभूमीसाठी सुप्रसिद्ध असलेल्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये मधुवयाच्या नव्हाळीत या संवेदनक्षम युवयुवतींच्या अंतःकरणांतील प्रणयभावना कशी अंकुरली, विकसित झाली आणि विरोधास आव्हान देऊन शेवटी कशी जिंकली; त्या संबंधातील खरीखुरी प्रेमपत्रे वाचायला मिळणे म्हणजे कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणे दुर्मिळच. अत्युत्कट प्रीतीच्या संबंधातील सर्व भावभावनांचा आणि हर्षामर्षसंघर्षांचा हा पत्ररूप आलेख हृदयस्पर्शी तर आहेच, पण त्या पत्रांतून व्यक्त होणाऱ्या तत्कालीन सामाजिक संकेतांचे दर्शनही विलोभनीय आहे.

**ह. वि. मोटे प्रकाशन**

३ वेस्ट व्ह्यू, दादर, मुंबई १४.

प्रमुख वितरक :

**पॉप्युलर प्रकाशन** : ३५ सी, ताडदेव, मुंबई ३४

**बॉम्बे बुक डेपो** : गिरगाव, मुंबई ४.



आपल्या अधिकाराचा दुरुपयोग
असा केला जातो.

व्यवस्थापनाच्या कार्यात जगात आज एक प्रकारची क्रांती होत आहे. तुलनेने आपल्या सरकारी कारखान्यातील व्यवस्थापक वर्ग मागासलेला व अकार्यक्षम आहे. बदलत्या परिस्थितीत कामगार पुढारीसुद्धा त्यांच्या क्षेत्रात अकार्यक्षमच आहेत. आपापल्या क्षेत्रात अकार्यक्षम असलेल्या या दोघांना एकत्र आणून कार्यक्षमता वाढविण्याची इच्छा करणे म्हणजे एकप्रकारचे स्वप्नरंजनच ठरेल.

डायरेक्टर बोर्डात कामगार प्रतिनिधी नेमण्याची सरकारने घोषणा केली आहे, अशा वेळीच या योजनेतील उणीवा व धोके सर्व संबंधितानी जाणून घेणे आवश्यक आहे. कामगारसंघटनांच्या संभाव्य हानीची दखल कामगारांनी जागरूकतेने घेतली पाहिजे. जॉइंट मॅनेजमेंट कौन्सिलसची योजना यशस्वी करण्यासाठी सरकारने योग्य ते परिश्रम घ्यावेत अशी मागणी कामगारांनी केली पाहिजे. कामगारक्षेत्रात करता येण्यासारख्या पुढील गोष्टी सरकारने प्रथमतः केल्या पाहिजेत.

१ : औद्योगिक न्यायालयाच्या कामाचा वेग वाढवला पाहिजे. वर्षानुवर्षे रेंगाळणारे औद्योगिक तंटे समाजवादाच्या भाषेशी विसंगत आहेत त्याची जाणीव सरकारला होईल तर बरे.

२ : कामगार संघटनांच्या मान्यतेच्या बाबतीत राजकारण आणणाऱ्या सरकारच्या तोंडात जरी समाजवादाची भाषा असली तरी वागण्यात फक्त राजकारणच आहे हे कामगारांनी आता ओळखले आहे. म्हणूनच आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्न नाही अशी शेखी मिरवणाऱ्या कामगार संघटनांनासुद्धा काँग्रेसी खासदारांना संघटनेच्या चेअरमन अथवा प्रेसिडेंट पदावर बसवावे लागते. कामगार क्षेत्रात घुसवलेले हे राजकारण बंद झाले तर त्यात कामगारांचे अधिक हित होईल. कामगारांच्या हिताच्या या पायाभूत गोष्टीकडे दुर्लक्ष करून, कामगार चळवळीवर डायरेक्टर पदाचा कळस चढविण्याची सरकारला झालेली घाई, दिसायला समाजवादी असली, तरी परिणामतः कामगारांच्या तोटयाची आहे, हे संबंधितांनी ओळखावे म्हणून हा धोक्याचा कंदिल दाखवण्याचे सकृत्दर्शनी कटु कर्तव्य केले आहे.

□ □ □

निवडणूक मतप्रवाह

# प्रभावी विरोधी पक्षाचा महाराष्ट्रात अभाव

**वा. दा. रानडे**

महाराष्ट्रात सर्वच विरोधी काँग्रेसच्या मानाने फार दुबळे आहेत. १९६७ च्या निवडणुकीत त्यातल्या त्यात दुसऱ्या क्रमांकाच्या जागा मिळविलेल्या शे. का. पक्षाची निरनिराळ्या मतदारसंघात यावेळी काय परिस्थिती आहे याचा विचार गेल्या अंकातील लेखात केला. इतर पक्षांची तरी काय परिस्थिती आहे ?

गेल्या निवडणुकीनंतरचा एक महत्त्वाचा बदल म्हणजे संयुक्त समाजवादी व प्रजासमाजवादी पक्ष एकत्र येऊन त्यांनी एक पक्ष स्थापन केला आहे. शिवाय शे. का. पक्षाशी त्यांनी निवडणूक समझोता केला आहे, त्यामुळे या निवडणुकीत त्यांना अधिक यश मिळण्याचा संभव कितपत वाढला आहे ? संयुक्त समाजवादी व प्रजा-समाजवादी या दोन पक्षांनी मिळून १२ जागा व ८·७६ मते मिळविली होती.

प्रजासमाजवादी पक्षाने गेल्या वेळी ज्या आठ जागा जिंकल्या त्यांपैकी निम्म्या रत्नागिरी जिल्ह्यात जिंकल्या होत्या. वेंगुर्ला, देवगड, राजापूर आणि लांजा या त्या जागा. समाजवादी पक्ष या चारही जागा पुन्हा लढवीत असून वेंगुर्ला, देवगड व राजापूर या तीन जागांसाठी तर त्यांनी पूर्वीचेच उमेदवार उभे केले आहेत. वेंगुर्ल्याची जागा समाजवादी पक्षाचे किनळेकर जिंकण्याची बरीच शक्यता आहे. १९६७ च्या निवडणुकीत या मतदारसंघात काँग्रेसला तिसऱ्या क्रमांकांची मते मिळाली होती. प्रजासमाजवादी व संयुक्त समाजवादी पक्षाने काँग्रेसपेक्षा अधिक मते मिळविली होती. या दोन्ही पक्षांची एकत्रित मते काँग्रेसपेक्षा १८ हजारांनी जास्त होती. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीतही प्र. स. पक्षाने काँग्रेसपेक्षा ६००० मते जास्त मिळविली हे लक्षात घेता काँग्रेसला ही जागा जिंकणे सोपे नाही.

देवगडच्या बाबतीत मात्र परिस्थिती निराळी आहे. प्र. स. पक्षाने १९६७ साली ही जागा ५१०० मतांनी जिंकली पण लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत या आघाडीची पीछेहाट होऊन प्र. स. पक्षाला या भागात काँग्रेसपेक्षा ६,५०० मते

**पृष्ठ ४२ वर**

नलिनी अंबाडे

# बाई, मी विकत घेतले मरण !

एर्नाकुलम् आणि कोचीन शहरांना जोडणाऱ्या पुलावर टॅक्सी येताच समुद्रावरचा गार वारा एकदम त्यांना जाणवला. डिसेंबर संपत आलेला, पण थंडी अद्यापही मागे रेंगाळतच होती. म्हाताऱ्या अय्यर शास्त्रीबुवांनी पिशवीतून शाल काढली, सायंकाळच्या संधीप्रकाशांत एअरपोर्टवरील दिवे दिसू लागले, अन बघता बघता एक वळण घेऊन टॅक्सी विमानतळासमोर थांबली. पांढरे शुभ्र धोतर, पांढराच कुडता, अन् पांढरं शुभ्र डोकं. म्हातारबाबा चष्मा सांभाळीत शाल पांघरून उतरले. वाटेत तिकिट दाखवलं–कोचीन ते मद्रास–अन् नेहमीच्या सरावानं समोरच्या अॅव्हरो विमानात शेवटच्या सीटवर जाऊन विसावले, विमान इथूनच सुटणारे, गर्दीही फारशी नव्हतीच. त्यांनी डोळे मिटून, दीर्घश्वास घेतला व मान सैलपणे टेकवली. पिशवीतून जपानी 'सान्यो' टेप-रेकॉर्डर काढला. मिटल्या डोळ्यांनीच कळ दाबली. मंद अन् गोड स्वरांचे वलय त्यांच्या पुरतंच निर्माण झालं. त्यांच्या मराठी सुनेनं म्हटलेलं ते गाणं–नाही खर्चिली कवडी दमडी, नाही फेकिला दाम । बाई मी विकत घेतला श्याम–त्यांची जणू समाधी लागली. विमान कधी सुरू झाले ते त्यांना समजलंही नाही...पण इतक्यात कसलातरी गचका बसला. सान्यो खाली पडला. शास्त्रीबुवांनी चमकून स्वतःला सावरले. समोरची एक बाई भुईसपाट झाली होती. कुणाचा थर्मास लवंडला होता. आकाशात झेप घेता घेता हे काय झालं होतं...?

शास्त्रीबुवांनी खाली फेकला गेलेला सान्यो उचलला. पुन्हा कळ दाबली... आवाज बंद...डोळे उघडून खटके दाबून खाटखूट...पण सान्यो गप्पच. शास्त्रीबुवांनी डोळे मिटून घेतले...त्यांच्या डोळयांसमोर पुन्हा त्यांची सून ..तिने म्हटलेले ते मराठी गाणे. हाऊ पॉसिबल ? हू कॅन पर्चेस गॉड ? प्रत्येक गोष्ट विकतच घ्यावी लागली तर ? अगदी मरण देखील मोफत नसावं ना ? साऱ्या आयुष्याची किंमत देऊन मनुष्य शेवटी मरण विकतच घेतो ना ! ते जाण्यापूर्वी

नवऱ्यासमोरही त्यांची सून किती स्फुंदून स्फुंदून रडली होती. त्यांच्यासाठी स्वेटर विणले. तिचे हुंदके कितीतरी वेळ त्यांच्या कानात घुमत होते. निरोप द्यायला एरोड्रोमवर यायचं होतं तिला.. अन् आताही त्यांना तसेच दबलेले हुंदके ऐकू आल्याचा भास झाला...स्फुंदणे विमानात कसे ? त्यांनी कान टवकारले. त्यांच्या म्हाताऱ्या कानांनी ऐकलेले चूक नव्हते. आवाज पाठीमागून येत होता. त्यांनी मान फिरवली. तेथे एअर होस्टेस उभी होती. दोघांची क्षणभर नजरानजर. पटकन ती गिरकी घेऊन पाठमोरी झाली. त्यांना चेहरा ओळखीचा वाटला. आपली सूनही अशीच दिसते, त्यांना वाटले. पुन्हा तिने मान वळवली. तशी त्यांनी आपली विद्यार्थिनी ओळखली. तात्काळ तिला बोलावले–

'वा मा इंगे.'

ती जवळ येताच बाजूच्या रिकाम्या सीटकडे बोट केले, अन् डोळ्याला डोळा दिला. तिचा नाकाचा शेंडा लालेलाल झालेला–डोळे भरून आलेले, ओठ थरथरणारे. त्यांनी थरथरणाऱ्या हाताने उपरण्याच्या टोकाने तिचे अश्रू पुसले. तसा तिचा बांध फुटला. दोन्ही हातांनी तिने तोंड झाकून घेतले. त्यातूनच दबलेले शब्द आले–

'सर, आज मी मरणार आहे.'

'पोडी, पैत्यकारी.' – (चल्, वेडी कुठली)

'खरंच सर,......मी...तुम्ही...सारेजण...आता मद्रासला कांही पोचत नाही आज...सर!'

'व्हॉट् डू यू मीन ?'

एव्हाना समोरच्या रांगेतील चार कान टवकारले गेले. अनुभवी म्हातारबुवांना शंका आली काहीतरी. प्रिन्सिपॉल म्हणून आत्तापर्यंत कॉलेजातील कित्येक मुक्यांना त्यांनी बोलकं केलं होतं. एकदम कणखर आवाजात तिला म्हटले–

'एक सेकंद वाया घालवू नकोस. वुई शॅल् डू एनीथिंग. बी फ्रँक माय् डॉटर.'

'सर...सर...' – इकडे तिकडे पहात ती अडखळली.

'गो अहेड. मी आहे तुला. बोल लौकर.'

'सर, आजचा पायलट ना, तो इतका प्यायलाय, की उभंदेखील राहाता येईना कोचीनला त्याला.'

'माय् गॉड्.'

'अन् तसाच भेलकांडत कॉकपिटात शिरला.'

'तरीच मघाशी ऑफ घेताना प्लेनचा पार बॅलन्स गेला होता.'

'सर, मी मागच्या ९ तारखेलाच–मदुरेच्या त्या ॲक्सिडेंटमधेच...खरी...'

'का गं, तू त्याला अडवलं नाहीस तिथे ? कोचीनलाच ?'

'तो कुणीतरी दादा असेल...वशिल्याचा...बडा' –मागचे कुणीतरी.

'हो ना! मी रेस्ट घ्यायला सांगितलं तर मलाच...'

'तर काय ?'

'सर...' तिने दोन्ही हातांनी तोंड झाकले. डाव्या हाताने डावा गाल चोळला अन् तोच तळवा पुढे ओठांवर दाबून हुंदका परतविला. शास्त्रीबुवांनी दीर्घ श्वास घेऊन रोखून धरला. तीच पुढे म्हणाली...

'सर, माझ्या डॅडींनीदेखील दोन बोटांची चापट कधी दिली नाही...पण... आज ह्याने मात्र...व्हॉट ए ग्रेट शेम...शेम् ऑन मायपार्ट..."

'डोंट वरी, बेटा डोंटवरी. प्लिसीज इनफ फॉर अस.'

एव्हाना ह्या संवादाकडे दहाबारा डोळे अन् कान लागलेले होते. विमानातील सर्वांना हे क्षणात समजले...प्रत्येकजण घाबरला...पंधरा दिवसांपूर्वीच...९ डिसेंबर १९७१ लाच ह्याच रूटवरचे असेच अॅव्हरो विमान रात्री मदुरेजवळ कोसळले होते. ३१जणांपैकी २१जण खलास...न्यायालयीन चौकशीचा हुकूम झाला. सदासिवम् म्हणून कुणीतरी न्यायधिशाची समिती जाहीर झाली...ते साक्षीपुरावे रोज प्रत्येकजण वाचीत होताच. तिथेही असाच 'पिण्याचाच' वास येत होता... प्रत्येकाला येथे आता आपले स्वतःचे चित्र दिसू लागले. इतक्यात पुन्हा विमानाला झटका बसला...लोकांचा तोल गेला...गचके देत विमान उभे राहिले...कोईमतूर आलेले होते. प्रथम सर्वांनी खाली उतरून घेतले. अन् मगच निवांतपणे श्वास घेतले. कुणीतरी एक अर्ज लिहिला...हा दारूडा (?) पायलट असेल तर आम्ही पुढे मद्रासला जाणार नाही इ. इ....साऱ्याच्या साऱ्या २५ प्रवाशांनी सह्या केल्या अन् कोईमतूर एरोड्रोमच्या रात्रपाळीच्या डे. कंट्रोलरसमोर अर्ज नेला. त्याने त्याच्या मोठ्या साहेबाला घरी फोन केला. मोठ्या साहेबाने हळूच विचारले, 'कोण आहे हो तो पायलट ?'

'आपला नेहमीचाच तो...तो गणेशन्...' त्याहून हळू आवाजात इकडून उत्तर गेले. तिकडून सल्ला आला. 'लोकांना म्हणावे पॅसेंजर्सच्या सर्वच तक्रारींची दखल घेण्यास आम्ही बांधील नाही. झोपू देत आजची रात्र इथेच सकाळी बघू'—खाड्दिशी फोन बंद झाला.

इतक्यात 'आले ! आले !!' गलका झाला. गणवेशधारी पोलीस एकदम दिसू लागले. कुणीतरी एक मंत्रिमहाशय हार-तुरे सांभाळीत सांभाळीत विमानाकडे जाऊ लागले. त्यांच्याही झोकांड्या जात होत्या म्हणे. इतक्यामध्ये कुणीतरी त्यांना सांगितले, 'विमानात फक्त पायलट आहे' आणि झाला प्रकार सांगण्यास प्रवासी पुढे झाले. तोच ते आपल्या ड्रायव्हरला म्हणाले, 'डैय्, इरोड पोलाम्. तिथे निलगिरी एक्स्प्रेस' मिळेल मद्रासकरिता.' बघता बघता मंत्रिमहाशयांची मोटार इरोडच्या दिशेने अदृश्य झाली. मंत्रिमहाशय अद्याप तमीळनाडूत सत्तेवर आहेत... पैसेवाले आहेत. त्यांचे नाव सांगू म्हणता ? महापाप ! राम ! राम !! राजाराम !!!

आता मात्र एक व्यक्ती पुढे झाली. हा तेजस्वी पुरुष म्हणजे तेथे बंदोबस्ताला असणारा डी. एस. पी. ! ताड् ताड् पावले टाकीत तो सरळ रनवेवर गेला अन् त्या रिकाम्या विमानात शिरला. विमानतळावरील झाडून साऱ्यांच्या नजरा तिकडे लागल्या. काहीजण घाबरले. कुणी त्याला मूर्ख म्हणाले. पाचच मिनिटांत डी. एस्. पी. साहेबांनी बकोट धरून, आधार देत एकाला चालवत बाहेर खाली उतरवले. तेच होते राजमान्य राजेश्री पायलट महाशय. हातवारे करून त्याने गाडी बोलावली अन् पायलटाला आत कोंबला. डॉक्टरांच्या तपासणीसाठी ! कुणीतरी म्हणाले, ' सध्याचा डॉक्टर एकदम कडक माणूस. तो कुणाला भीत नाही. सरळ प्यायल्याचं लिहून देईल बघा. '

इतक्यात प्रवाश्यांना सांगण्यात आले ' सकाळी उद्याला बघू. आजची रात्रीची राहाण्या जेवणाची सोय इथे करण्यात आलेली आहे. अर्थात तो खर्च इंडियन एअर लाइन्स कार्पोरेशनचा '

एकमेकांत बोलत बोलत सारे सह-प्रवाशी निघाले... शांत चित्ताने.

' चला. आजचं मरण तर टळलं ! '

' नाहीतर काय ? २५० रुपये देऊन ... वुई पर्चेस अवर ओन् डेथ वॉरंट '

' आणि ह्यांचा संप. पगारवाढ हवी ह्यांना. '

' देवाचे आभार माना ... समजा त्या मदूरेच्या मेघामलै अॅक्सिडेंट प्रमाणे आपलंही विमान कोसळलं असतं तर ? ... तर .. '

' तर ह्याचीही चौकशी समिती सरकार नेमील अन् नॅचरल कलॅमिटी सिद्ध करील ' – दुसऱ्याने परस्पर उत्तर दिले त्याला.

' अहो, मद्रासहून दिल्लीला जाताना फक्त शिळा पाव दिला आम्हाला एकदा.'

' आणि...गावातून एअरपोर्टपर्यंत ती फ्री-बस असते ना, ती पण आता बंद करणार आहेत म्हणे.'

' बंद नाही, तर माणशी साडेसात रुपये घेणार. त्यापेक्षा टॅक्शी बरी '

बोलत बोलत ते सर्व २४ प्रवासी रेस्टॉरंटमध्ये आले. एकजण कमी कसा ? हां, ते म्हातारबाबा प्रिन्सिपॉल आधीच आत जाऊन बसलेले होते. तो ' सान्यो ' समोर फिरत होता. मंद आवाजात काहीतरी बिगर-तमीळ ऐकत होते, ' नाही खर्चिली कवडी दमडी ... नाही फेकिला दाम ... बाई मी विकत ...'

□ □ □

# आम्हाला बंडखोरी करण्याचा हक्कच आहे

**प्रतिनिधी**

श्रीमतीजींनी गेल्या आठवडयात महाराष्ट्राचा झंझावाती प्रचारदौरा केला. मुंबईतही त्या आल्या. स्वत: प्रधानमंत्री निवडणूक प्रचारदौऱ्यावर येण्याने खूप काही साधले जातें. प्रचारदौऱ्यात त्यांना एक महत्त्वाची दखल घ्यावी लागत आहे, ती महाराष्ट्रातील बंडखोर कॉंग्रेसजनांची.

अकोला आणि औरंगाबाद येथील दौऱ्यात त्यांनी जाहीररीत्या बंडखोरांना कानपिचक्या दिल्या. त्यांच्यावर कडक टीका केली. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर 'आगामी निवडणूकीत कॉंग्रेसच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध निवडणूक लढविणाऱ्या बंडखोरांकडून स्वत:चे हितसंबंध व प्रतिष्ठा जपण्याचे प्रयत्न होत असून त्यांच्याकडून ना पक्षाची ना देशाची सेवा घडणार आहे. या बंडखोरांना दिलेली मते वाया जाणार आहेत.' म्हणून मतदारांनी त्यांना मते देऊ नये असे आवाहन करून या पुढे म्हणतात. 'पक्षाने तिकीट दिले नाही म्हणून स्वतंत्रपणे निवडणूक लढविणारे कार्यकर्ते, पक्ष व देश या दोघांशीही प्रामाणिक राहू शकत नाहीत. वैयक्तिक लाभ व प्रतिष्ठेसाठी जे पक्षत्याग करतात ते देशसेवा काय करणार?"

एवढे म्हटले तरी त्यांना पुढे थोडें सावरून घ्यावे लागलेच. म्हणूनच थोडा सूर खाली आणून त्यांना त्याच्या भाषणात म्हणावे लागले, की ज्यांना कॉंग्रेसने तिकीटे नाकारली ती सर्व मंडळी वाईट आहेत असे नव्हे पण नवागतांसाठी जागा करून दिली पाहिजे. नवागतांना जुन्यांनी मार्ग करून दिला नाही तर नवीन गोष्टी आकार घेणार कशा ?

महाराष्ट्रातील बंडखोर कॉंग्रेसजनांविरुद्धच्या शिस्तभंगाच्या कारवाईला तातडीने सुरुवात झाली आहे. पहिल्या यादीप्रमाणे एकूण ४३ जणांविरुद्ध अशी कारवाई

केली जाणार आहे. त्यात औरंगाबाद जिल्ह्यातील अंबरचे श्री. अण्णासाहेब उडाण, मुख्यमंत्र्यांच्या यवतमाळ जिल्ह्यातील श्री. गोविंदराव बुचके, चंदगडचे सहकार महर्षी श्री. व्ही. के. चव्हाण-पाटील हे तीन आमदार व इतर बरेच जेष्ठ काँग्रेस-जन आहेत.

याचाच भाग म्हणून तालुका काँग्रेस कमिट्या बरखास्त करण्यात येत आहेत. यानुसार औरंगाबाद जिल्ह्यातील जालना व अंबर आणि कोपरगाव तालुका काँग्रेस कमिट्या बरखास्त करण्यात आल्या आहेत. या काँग्रेस कमिट्यांचे कोणी पदाधिकारी एकतर अधिकृत काँग्रेस उमेदवाराविरुद्ध निवडणूक तरी लढवीत आहेत किंवा काही कमिट्यांनी बंडखोर उमेदवारांनाच पाठिंबा देण्याचे ठराव संमत केले आहेत. कोपरगाव तालुक्यात तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने अस्थायी समिती नेमली आहे. कारण कोपरगावच्या संपूर्ण तालुका काँग्रेस कमिटीने नवकाँग्रेसचे उमेदवार श्री. रोहमारे यांना विरोध करून बंडखोर उमेदवार श्री. शंकरराव कोल्हे यांना पाठिंबा दिला आहे.

याच संदर्भात अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस श्री. चंद्रजीत यादव यांनी देशातील सर्वच प्रदेश काँग्रेस कमिट्यांना परिपत्रक पाठवून ' शिस्तभंग कारवाई-साठी काँग्रेस श्रेष्ठींच्या पूर्वानुमतीसाठी थांबू नका. ती तत्परतेने करा ' अशी सूचना केली आहे.

अशा प्रकारच्या कोणत्याही कारवाईने बंडखोरी मुळीच थांबणार नाही. काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते अगदी उघड उघड म्हणतात, की काँग्रेस पक्षाची स्थापनाच मुळी बंडखोरीवर झाली आहे.

बंडखोर काँग्रेस कार्यकर्ते व अपक्ष उमेदवार श्री. भास्करराव गलांडे यांच्या प्रचारसभेचा नारळ १६ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहाच्या भरात श्रीरामपुरात फोडण्यात आला. त्याप्रसंगी साखर कामगार नेते श्री. गंगाधर ओगले तर सरळ सरळ म्हणालेच, ' बंडाळीचे राजकारण आम्हाला इंदिराजींनीच शिकविले आहे आणि आता तो राजमार्गच झाला आहे. '

पूर्वी काँग्रेसमध्ये बंडखोरी नव्हती असे नाही, पण तशी ती तुरळक प्रमाणात होती. नवकाँग्रेसच्या एम. पी. सी. सी. चे सध्याचे उपाध्यक्ष श्री. शंकरराव गेडाम यांचा ६७ सालच्या विधानसभा निवडणुकीत नागपूरच्या कटोल मतदार संघातून पराभव झाला होता. त्यामागे बंडखोरीच होती. पण श्रीमतीजींनी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या वेळी उघड उघड बंडखोरी केली आणि प्रत्येकाने आपल्या मना-प्रमाणे निर्णय घेऊन मतदान करावे अशी त्यांनी मुभा दिली. काँग्रेसचे राष्ट्रपति-पदासाठी उभे असलेले अधिकृत उमेदवार श्री. संजीव रेड्डी पडले त्यामागे बाईंचीच बंडखोरी व बंडखोरीला दिलेले प्रोत्साहन होते. त्याचवेळी पक्षशिस्त व शिस्तभंगा-विरुद्धची कारवाई आटोपली. हा ' आदर्श ' सर्वच काँग्रेसजनांपुढे असताना बंडखोरी

होणार नाही तर काय ? एवढेच नव्हे तर बंडखोरी करूनही कोणाविरुद्ध तशी खास कारवाई होतच नाही. कारणे दाखवा नोटिशी बजावल्या जातात, पण नंतर मात्र सारे काही शांत होते. एकूण हा सारा फार्सच असतो. कित्येक वेळा बंडखोरांना बक्षीस मिळते.

याची भरपूर उदाहरणे देता येतील. त्यापैकी पुढील उदाहरण तर प्रमुख आहे. महाराष्ट विधान परिषदेसाठी पुणे शहर प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. रंगराव पाटील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून उभे होते. काँग्रेसचे मताधिक्य असूनही ते पडले. त्यांना श्री. शिवाजीराव ढेरे यांच्या गटाने पाडले असे उघड उघड बोलले जात असे. पाटील यांच्या पराभवाची कारणे शोधून काढण्यासाठी श्री. नरेंद्र तिडके व श्री. आबासाहेब निंबाळकर या मंत्रिद्वयांची समिती नेमण्यात आली. समितीने अहवालही तयार केला. पण 'अडचणीचा अहवाल' म्हणून तो दडपूनच टाकण्यात आला. याउपर धमाल म्हणजे श्री. रंगराव पाटील यांना अध्यक्षपदावरून दूर व्हावे लागले आणि श्री. शिवाजीराव ढेरे यांची त्या जागी वर्णी लागली. एवढेच नव्हे, तर त्यांना तिकिटाचा नजराणाही अर्पण करण्यात आला.

राज्यसभेवर जाणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीतही असेच झाले. नवकाँग्रेसचे अधिकृत उमेदवार श्री. वैशंपायन यांचा पाडाव करून महाराष्ट्र विधानसभा व परिषदेत अल्पमतात असलेल्या संघटना काँग्रेसचे श्री. बाबूभाई चिनॉय हे निवडून आले. चौकशीचा फार्स करण्यात आला खरा, पण कोणाविरुद्ध काहीही कारवाई झाली नाही. होणारच कशी ? प्रधान मंत्र्याचा आदर्श होताच की समोर !

नासिक जिल्ह्यातूनही बंडखोरीमुळेच भारतीय क्रांतिदलाचा उमेदवार निवडून आला होता. पण त्याविरुद्धही कारवाई झाली नाही. नगर, नासिक जिल्ह्यात तर पूर्वीपासूनच बंडखोरी आहे. पण ती आता प्रचंड प्रमाणात आहे. बरं उघड बंडखोरीपेक्षा दबून राहिलेली, धुमसत असलेली छुपी बंडखोरी फारच मोठी आहे. त्या बंडखोरीचे स्वरूप हिमनगाप्रमाणे आहे पाण्यावर असणाऱ्या भागापेक्षा तीनपट भाग पाण्याखालीच असतो त्याप्रमाणे ही छुपी बंडखोरी आहे.

श्री. व्यंकटराव हिरे (उपमंत्री) व आमदारद्वय श्री. पंडीत धर्मा पाटील आणि श्री. शांताराम वावरे या नासिक जिल्ह्यातील तीनही प्रमुख नेत्यांना नवकाँग्रेसने तिकिटे दिली नाहीत. त्यामुळे पक्षाच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार करण्याबाबत सारं कसं शांत शांत आहे ! काहीजण फक्त 'दाखविण्याइतकेच' काम करीत आहेत व इतर काही जण आपल्या जेवढ्या लोकांना तिकिटे मिळाली आहेत त्यांच्यासाठीच फक्त काम करीत आहेत. नासिक जिल्ह्याला लागलेली बंडखोरीची झळ इतकी तीव्र आहे, की त्यामुळे एम. पी. सी. सी. चे सारे पदाधिकारीच अत्यंत बेचैन व अस्वस्थ झाले आहेत. एम. पी. सी. सी. च्या एका बड्या नेत्याकडून मिळालेल्या एका खास व खात्रीलायक बातमीनुसार असे दिसते, की नासिक

जिल्ह्यातील बागलांड मतदार संघातील नवकाँग्रेसचे अधिकृत उमेदवार श्री. मा. गो. थांबरे यांना निवडणूक निधी व प्रचारासाठी कार्यकर्ते मिळणे अत्यंत अडचणीचे होऊन बसले आहे.

महाराष्ट्रात असा एकही जिल्हा नाही, की जेथे बंडाळी नाही. केंद्रीय अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री. श्री. वसंतराव नाईक व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील यांच्या जिल्ह्यात तर ती फारच मोठ्या प्रमाणात आहे.

पाटबंधारे मंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांचा उजवा हात समजले जाणारे, सहकार महर्षि खासदार बाबुराव काळे यांनी तर जाहीरपणे म्हटले आहे, की ' मुख्यमंत्री हा मराठवाड्यातीलच व्हावा असे जो म्हणणार नाही त्याच्या प्रचाराला मी जाणार नाही. ' हा बंडखोरीचाच प्रकार नाही तर काय ?

सावंतवाडीचे श्री. शिवराम भोसले काँग्रेसचा काहीही प्रचार न करता स्वस्थ बसले आहेत. देवगड तालुक्यात तसेच कुलाबा जिल्ह्यातील महाड तालुक्यातही काँग्रेसजनात असेच औदासिन्य आहे. हे औदासिन्य म्हणजेही बंडखोरीचा भाग आहे. कुलाबा जिल्ह्यातील बंडखोरीचे कारण श्रीमती कमलाबाई विचारे यांच्यासारख्या जिल्ह्याबाहेरील व्यक्ती उमेदवार म्हणून लादल्या आहेत.

ठाणे जिल्ह्यातही ह्याच प्रकार. तेथेही मातब्बर काँग्रेस जनांकडून बंडखोरी चालूच आहे. पण त्याविरुद्ध उपाय योजना व कारवाई काही झाली का ? अगदी बिलकुल नाही. उदा. जव्हारमधून माजी आमदार श्री. बाबुराव जाधव हे काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध उभे आहेत. (६२ ते ६७, पर्यंत ते या भागाचे आमदार होते, तर त्यांची कन्या सौ. कलावती करंवदे या ६७ साली तेथूनच विधानसभेवर निवडून गेल्या.)

कोल्हापूरचे श्री. रत्नाप्पा कुंभार यांनी मध्यावधी निवडणुकीत सरळ सरळ विरोधी पक्षाचा प्रचार केला. त्यांच्यावर शो कॉज नोटीस बजावण्यात आली. पण त्यापलीकडे काही झाले नाही. नाही म्हणायला एम. पी. सी. सी. ने मुंबईत त्यांना तिकीट नाकारले. पण रत्नाप्पांची वट दिल्लीत जबरदस्तच आहे. ते साऱ्यांच्या नाकावर टिच्चून दिल्लीहून तिकीट घेऊन आले.

जळगावात तर बंडखोरीचा जबरदस्त असंतोष धुमसत आहे. त्याचे असे आहे, की महाराष्ट्र युवक काँग्रेसचे अध्यक्ष व काँग्रेसचे तरुण कार्यकर्ते श्री. मधू पाटील यांना तिकीट देण्यात आले आहे. पण त्यांच्यावर काही आरोप आहेत. त्याच जिल्ह्यातील काँग्रेसचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते व माजी आमदार श्री. हिरालाल कल्याणी यांनी प्रधानमंत्र्यांना पत्र लिहून श्री. पाटील यांच्याविरुद्ध काही आरोप केले आहेत व हे सारे आरोप त्यांनी पुराव्यानिशी केले आहेत. श्री. मधू पाटील हे अमळनेरहून एफ्. वाय्. पास झाले. पण त्यांना श्रेणी मिळाली नाही म्हणून त्यांनी

ते एस्. एस्. सी. असल्याचे दाखवून मराठवाडा विद्यापीठात प्रवेश मिळविला. विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे हा 'फ्राड' आहे. यानुसार त्यांच्यावर मराठवाडा विद्यापीठाला फसविल्याचा आरोप आहे. तेव्हा अशा माणसाला तिकीट दिल्यामुळे तेथील युवक खवळले असून प्रचाराबाबत सारेच जण उदासीन आहेत.

बीड जिल्ह्यातील चौसाळा मतदार संघातून उभ्या असलेल्या काँग्रेसच्या अमेदवार सौ. केसरबाई सोनाजी क्षीरसागर यांच्यावर व त्यांच्या यजमानांवर भ्रष्टाचाराचे अतिशय गंभीर आरोप आहेत. तशा प्रकारची निवेदने निवडणूक मंडळाला सादर करण्यात आली आहेत. शिवाय त्या अलीकडेच काँग्रेसविरोधी पक्षाचे काम करीत होत्या. असे असूनही त्यांना तिकीट दिले गेले आहे. यामुळे बीड जिल्ह्यात फार मोठा असंतुष्ट गट आहे.

# माणूस

## मालकी व तत्संबंधित इतर तपशीलाचे निवेदन

[ अधिनियम ४, नियम ८ अन्वये ]


| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ : | पुणे |
| २. प्रकाशन काल : | साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व | भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नावे व पत्ते | राजहंस प्रकाशन<br>१. ब. मो. पुरंदरे<br>१०२५ सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव, पुणे ३० |
| | वर दिलेला तपशील बरोबर आहे. |
| | प्रकाशकाची सही |
| दिनांक ४ मार्च १९७२ | श्री. ग. माजगावकर |

बुलढाणा जिल्ह्याने तर कमालच केली आहे. इंदिराबाईंनी तेथील कॉंग्रेस-जनांच्या डोक्यावरच हात ठेवलेला असावा असे दिसतेय. आपल्याला नको असलेल्या अधिकृत व्यक्तीला पाडण्याचा इंदिराबाईंचा कित्ता या जिल्ह्याने तंतोतंत गिरविला आहे. तेथे बंडखोरी इतकी बेमालूम चालली आहे, की ती उघड उघड दिसते आहे, पण ती सिद्ध करणे फारच जड आहे. त्यामुळे कॉंग्रेसश्रेष्ठीही चक्रावून गेले आहेत.

चाईटातूनही चांगले होते असे म्हणतात. श्रीरामपूरहून उभे असलेले माजी कॉंग्रेसजन व बंडखोर अपक्ष उमेदवार श्री. भास्करराव गलांडे यांच्यावर आरोप करताना एम. पी. सी. सी. च्या एका जेष्ठ नेत्याने कॉंग्रेस कसा पैसा मिळविते याचीच वाच्यता केली आहे. त्यांना साह्य करणाऱ्या एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने आपल्या हद्दीबाहेरील शेतकऱ्यांकडून २५ हजार टन ऊस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. आणि तो खरेदी करताना दर टनामागे ३ रुपये कमिशन दिले जाणार आहे. अशा प्रकारे कारखान्याकडून जी ७५ हजार रुपयांची रक्कम दिली जाणार आहे ती निवडणुकीसाठीच वापरली जाणार हे अगदी उघड आहे असे म्हणतात. पण आजचे हे माजी कॉंग्रेसजन कालपर्यंत कोणत्या पक्षात होते ? ही कला ते काय एका रात्रीत शिकले आणि मग ह्यावेळी कॉंग्रेस श्रेष्ठींनी त्याविरुद्ध काही वाच्यता का नाही केली ?

मुंबईतही पाच आमदार व सुमारे २५ ते २६ नगर सेवक निवडणूकीबाबत भयंकर उदासीन आहेत. बी. पी. सी. सी. चे सरचिटणीस ॲड. मेंगरे यांनी पुन्हा पुन्हा विनवण्या करूनही त्याचा काही परिणाम झालेला नाही. प्रचाराला न येता आपापल्या घरी बसून राहणे हीसुद्धा बंडखोरीच समजली जाईल. त्याचे गंभीर परिणाम होतील असा कडक इशारा दिला आहे. पण त्याचा काहीही उपयोग झालेला नाही.

या बंडखोरीमागील महत्त्वाची कारणे म्हणजे आता उभे असलेले (तिकीटे दिले गेलेले) उमेदवार हे नव्या बाटलीतील जुन्या दारुप्रमाणे आहेत. सहकारी क्षेत्र, जिल्हा परिषद वा इतर ठिकाणच्या सत्ताधीशांनाच अदलून बदलून पुन्हा जागा दिल्या आहेत. तर नासिकसारख्या ठिकाणी साऱ्याच जेष्ठ व मातब्बर नेत्यांना डावलण्यात आले आहे. कुलाबा जिल्ह्यासारख्या ठिकाणी बाहेरचा उमेदवार लादण्यात आल्यामुळे तर जळगाव, बीड येथे भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांनाच तिकिटे दिल्यामुळे हा सारा असंतोष निर्माण झाला आहे. त्यातूनच वेगवेगळ्या प्रकारची बंडखोरी निर्माण झाली आहे. ही बंडखोरी थोपविण्यात वा मोडून काढण्यात कॉंग्रेसश्रेष्ठी कितपत यशस्वी होतील हे दिसेलच, पण 'आम्हाला बंडखोरी करण्याचा हक्क आहे' असे प्रधानमंत्र्यांकडे बोट दाखवून कोणीही म्हणू शकेल, नव्हे लोक तसे म्हणत आहेत. या साऱ्याचे परिणाम विधानसभा; जिल्हा परिषद वा इतर साऱ्याच निवडणुकांवर काही प्रमाणात तरी जरूर होणार आहेत पण सर्वांत महत्त्वाचा परिणाम कॉंग्रेस-संघटनेवर होणार आहे. □ □ □



# पत्र

वसंत भणगे

डायरेक्टर रणदिवे केबीनमध्ये बराच वेळ बसून होते. आत महत्त्वाच्या कामाशिवाय कुणाला पाठवू नका अशी त्यांनी ताकीद दिली होती. बऱ्याच गोष्टींवर निर्णय घ्यायचे होते. कामं पुष्कळ पडली होती. पण कामात त्यांचं मुळीच लक्ष नव्हतं. कलकत्यांत चालू होणाऱ्या ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे बैठकीला जायचं त्यांनी शेवटच्या घटकेला टाळलं होत.

एक कडक शिस्तीचा अधिकारी म्हणून त्यांचा दरारा होता. हातांत बऱ्याच गोष्टी असूनही गुलाबी वातावरणापासून ते बरेच अलिप्त होते. मेवलचं पत्र त्यांच्या हातांत होतं. त्या पत्रानेच त्यांचा सारा मूड घालवून टाकला होता. पत्रातील एका परिच्छेदाने त्यांच्या उत्साहावर पाणी पाडलं.

'आपलं दोघाचं लग्न व्हावं अशी आपली इच्छा आहे. खर पाहू गेल तर तुमच्या या मागणीत सर्वार्थाने माझा गौरव आहे. पण भावनेच्या आहारी मला जाऊन चालणार नाही. आपल्या दोघांच्या वयातील अंतराने लग्नाची कल्पना मला शिवत नाही. तुमच्या हाताखाली मी सहा महिने काम केले आहे. माझ्या घरच्या अडचणीपासून मी नोकरी सोडली आहे याची आपणाला कल्पना आहे. आपली ताटातूट झाली. तुमच्याविषयी मला खूप आदर आहे. तुम्हाला नकार ही कल्पनाच मनाला असह्य आहे. आपलं लग्न होऊन त्याची खात्रीने

सुखात परिणिती होणार नाही. मी स्पष्टपणे लिहिलं आहे. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. स्पष्टवक्तेपणा आपला स्थायीभाव आहे.'

रणदिव्यांचं मन विषण्ण झालं. दोन्ही हातांनी त्यांनी आपलं डोकं घट्ट पकडलं. खरं पाहू गेलं तर दोघांच्या वयात अंतरच फार होतं. पण त्यांच्या तिच्यावरील निकोप प्रेमापोटी हे अंतर कधी झालं नसतं का. त्याना मनापासून खात्री होती, मेबल तिच्या निर्णयापासून परावृत्त झाली असावी.

कुठल्याही गोष्टीबाबत चटकन निर्णय घेण्याची रणदिव्यांची वाखाणण्याजोगी जिद्द होती. आपल्या या गुणापाईच ते सगळ्या गोष्टी झटपट उरकून टाकीत. मेबलला प्रत्यक्ष भेटून आपला विचार तिच्या समक्ष मांडावा आणि पहावं असा विचार त्यांच्या मनात आला. पण प्रश्न होता वयाचा. पण खरं प्रेम कधी कुठल्या अडचणींचा विचार करते का !

काही वेळ त्याच मनःस्थितीत निघून गेला. त्यांना तडकाफडकी निकाल लावायचा होता. ते उठले. संध्याकाळची डेक्कन क्वीन पकडली. पुण्यात मेबलचं घर होतं.

रात्र होती. मेबल अंगणातच होती. रणदिव्यांना अकस्मात आलेले पाहून तिला आश्चर्याचा धक्काच बसला. हसून तिनं त्यांचं स्वागत केलं. त्या स्वागतात नाटकीपणा नव्हता, मन मोडल्याचं दुःख नव्हतं, की नेहमीचा औपचारिकपणा ! ती पायरीवर बसून होती. रणदिवे पायरीच्या खाली उभे होते. खरं पाहू गेलं तर त्यांच्या वयात अंतर कुठं जाणवत होतं. ते उंच होते. सुदृढ होते. त्यांचे खांदे बरेच रुंद होते. घाऱ्या डोळ्यांत एक अलौकिक करारीपणा होता. ती सुंदर होती बांधेसूद होती. कुठल्याही पुरुषाला घायाळ करील असंच तिचं सौंदर्य होतं.

'सर, तुम्ही मला आश्चर्याचा धक्का दिलाय हं ! स्वप्नांतसुद्धा मला वाटलं नसतं की तुम्ही यावेळी याल ते, माझं पत्र मिळालं की नाही ?'

'तुझं पत्र मिळालं म्हणूनच तर एवढ्या गडबडीनं तुझ्याकडे आलोय. मेबू. खरोखरच तुला तुझ्या निर्णयाला मुरड घालावीशी वाटत नाही ?'

ती गोड हसली.

रणदिव्यांनी तिच्याकडे लाचारीनं बघितलं.

तिला रणदिवे आवडत होते. त्यांचा स्वभाव, प्रकृती, मान, हुद्दा आणि सगळ्या गोष्टी, ज्या फक्त भाग्यवान पुरुषांच्या वाट्याला येतात.

'सर', मला तुम्ही क्षमा करा पण माझ्या ठरलेल्या निर्णयापासून मला माघार घ्यायला भाग पाडू नका. माझ्या पत्रात तसं मी मुद्दाम लिहिलं आहे. खरोखर तुम्ही मला क्षमा करा माझ्या निर्णयाबद्दल.'

रणदिवे पुतळ्यासारखे स्तब्ध होते. आयुष्यात ज्या ज्या गोष्टींचा त्यांनी हव्यास धरला होता त्यांत त्यांना माघार घ्यावी लागली नव्हती. काय बोलावं ते त्यांना

सुचेना. कॅलिफोर्निया विद्यापीठात घेतलेली इंजिनिअरिंगची उच्च पदवी, ऑफीस-मधील सत्ता, पैसा, मोटारी, अधिकार, सगळं ऑफिसचं त्यांच्याभोवती गरगर फिरू लागलं. वयातील अंतर त्यांच्या जीवनातील सौख्याच्या आड येत होतं.

मेबलसुद्धा गोंधळल्यासारखी झाली. तिला मनातून अतिशय वाईट वाटलं. चेहऱ्यावरील गुलसरपणा जाऊन तिथं काळजीचं जाळं विणलं गेलं. प्रेम ही भावना असते. पण केवळ भावना म्हणजे थोडच प्रेम होऊ शकतं.

'सर तुमच्या मनाची वेदना मला कळते.' ती मनातून बावरली होती. गोंधळली होती. एका मोठ्या अधिकाऱ्याला ती समजवीत होती. विचारापासून परावृत्त करत होती. अधिकार फिरल्यासारखी. काळ बदलल्यासारखी.' एक काळ असा येईल, की आपलं लग्न झालं नाही. हे चांगलं झालं असं आपणाला निश्चितपणे वाटेल. आता तुम्हाला ते चटकन् समजून येणार नाही. तुम्ही विचार करा. आपलं लग्न झालंच तर काही वर्षं आनंदात समाधानात निघून जातील. नाही असं नाही. पण नंतर काही वर्षांनी वयपरत्वे अपरिहार्यपणे आपली आवड बदललेली असेल. एकाला शांतचित्ताने बसून वाचन मनन करावसं वाटेल तर दुसऱ्याला क्लबांत बसून संगीताच्या तालावर नृत्यांत बेहोष व्हावंसं वाटेल. एकाला मुलाच्या भवितव्यासाठी विचार करावासा वाटेल तर दुसऱ्यास स्वतःचच भवितव्य पाहण्यासाठी धडपडावं लागेल. एकाला घरातील गोंगाट गडबड असह्य झाली असेल तर दुसऱ्यास हीच परिस्थिती आवडणारी असेल. एकंदरीत एकाची जीवनाची संध्याकाळ सुरू होईल तर दुसरीकडे मध्यान्हीचा सूर्य नुकताच कुठं कलला असेल. हे कसं शक्य आहे. मला विचारसुद्धा सुचत नाही. रथचक्र वेगात कसं चालणार ? नको तिथं आणि नको त्या वेळी वेग मर्यादा बसणार आहे त्याला'

'मेबल, सगळी बंधनं झुगारून देऊन तुझ्याकडे भीक मागितली. यापलीकडे माझ्या-सारखा माणूस आणखी काय करू शकला असता. तुझ्यापेक्षा सुंदर आणि सुशील संपन्न बाईशी लागेबांधे जोडायला मला वेळ लागणार नाही याची तुला कल्पना आहे. पण तुझ्याविषयी एवढं मला का वाटतं आहे याचं त्या परमेश्वरापाशीच उत्तर सापडू शकेल.'

'मला या गोष्टी योग्य वाटत नाही. सर! माझा नाद तुम्हाला सोडायला हवा. तुमच्यासारख्या व्यक्तीची माझ्यासारख्या स्त्रीकडून अशी अवहेलना व्हावी हे खात्रीने तुमचं तसंच माझं दुर्दैव आहे. पण आपलं वय ! लग्न हीच मोठी दुर्दैवी घटना ठरणार आहे. तुम्ही एक महाराष्ट्रीयन आणि मी एक ख्रिच्चन युवती. या दृष्टीनं माझा नकार मुळीच नाही. असल्या जात-धर्माच्या गोष्टींना मी कधीच किंमत दिली नाही. पण माझ्या निर्णयापासून खात्रीनं मला परावृत्त व्हायचं नाहीय.'

रणदिवे हरले होते. त्यांचा पराभव झाला. पण पराभवाचं दुःख झेलायला ते

खंबीर होते. खांदे रुंदावत निर्विकार चेहऱ्याने रणदिवे परतले.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये रणदिवे आले. कामं पुष्कळ पडली होती. पेपर्स, फाइल्स सरकत होत्या. माणसं भेटत होती. हुकूम सोडले जात होते. काहींना समज दिला जात होता. काहींबरोबर गप्पागोष्टी चालल्या होत्या. काहींवर गरम होणं भाग होतं, काहींबरोबर खोटं खोटं हासावं लागत होतं. शिस्तीसाठी वर करारीपणाचं आवरण होतंच. सगळं नेहमीसारखं आणि नेहमीच्या गतीनं चाललं होतं. दिवस भरकन निघून गेला.

रणदिवे ऑफिसमध्ये एकटेच बसले होते. ऑफिसमध्ये सामसूम होती. त्यांना परत मेबलचा विचार आला. तिच्याविषयी अजूनही त्यांच्या मनात अढी नव्हती.

इंजिनिअरिंगची पदवी घेतल्यावर ते वडिलांच्याच धंद्यात उतरले. थोड्याच दिवसांत वडिलांमागून कंपनीचे डायरेक्टर झाले. सारी सूत्रे त्यांच्या हातात होती. मेबल त्यांची सेक्रेटरी. ती अविवाहीत होती. लग्नाची टाळाटाळ तिने का चालविली होती कुणास ठाऊक. रणदिव्यांनी विचार केल्यावर त्यांना वरं वाटलं. तिचं म्हणणं पटलं. तिची भूमिका योग्य होती. ती धर्म पैसा शिक्षण आणि शुद्धप्रेमाच्याही पलीकडे होती. तिचा व्यवहारी दृष्टिकोन, दूरदृष्टी योग्य होती.

मेबल होती बेचाळीस वर्षांची आणि डायरेक्टर रणदिवे होते फक्त तेवीस वर्षांचे!

□ □ □




# इन्साफ! जनाऽऽब इन्साऽऽफ!



पंजाबमधला
एक गाजलेला
खून खटला

अनुवाद
ॲडव्होकेट
माधव कानिटकर

**लेखांक : दोन**

....शवविच्छेदनासाठी मोहिंदरसिंगाचे प्रेत सरकारी इस्पितळाचे वॉर्ड बॉईज हळूहळू ढकलीत नेत होते...आणि इतक्यात एक चमत्कार घडला ! एक बाई झपाटल्यासारखी त्याच्या प्रेतावर आडवी पडत किंचाळली, "नाही ! डॉक्ट ऽऽऽ र ! नाही ! मी शवविच्छेदन होऊ देणार नाही !"

आपल्या नातलगांच्या प्रेताची चिरफाड केलेली काही भावनाप्रधान लोकांना आवडत नाही. त्यातले काही अवयव डॉक्टर काढून घेतात म्हणे ! तसाच हा

प्रकार असेल म्हणून सरकारी डॉक्टर बाईची समजूत घालायला बाहेर आले. पण बाई अडाणी नव्हती ! या बाईचं नाव होतं सौ. भारद्वाज. मोहिंदरसिंगाची आत्या ! तिने अस्खलित इंग्रजीत डॉक्टर मजकुरांना सुनावले, "डॉक्टर ! मी वकिलाचा सल्ला घेऊन आले आहे. हा मेलेला नाही, याला मारलेला आहे ! तुम्ही डॉक्टर असलात तरी सरकारी. पंजाबी पोलिसांवर माझा विश्वास नाही. आमचा डॉक्टर इथे येईल त्याच्या देखत तुम्ही शवविच्छेदन केलं पाहिजे !"

सरकारी डॉक्टर चपापला. डॉक्टर असला तरी सरकारी नोकर तो ! गव्हर्नमेंट सर्व्हंट ! कोणताही गव्हर्नमेंट सर्व्हंट उगाच भानगड नको या विचाराने असं कुणी भेटलं म्हणजे कायदा पाळून जपून, काम करतो.

हलक्या आवाजात डॉक्टर उत्तरले, "बाई ऽ ! माझं काही म्हणणं नाही ! तुम्ही कॉरोनरकडून स्टे-आर्डर घेऊन या. प्रेतं फाडायला काय ? मागे रांग लागली आहे बघा ! मी चार वाजेपर्यंत थांबतो."

...कॉरोनर चांगला होता. त्याने हुकम दिला, की "मोहिंदरसिंगाचं शवविच्छेदन करावं सरकारी डॉक्टरनंच, पण अर्जदार सौ. भारद्वाज यांच्या विश्वासातल्या डॉक्टरच्या देखत."

.. बरोबर ५ वाजता मृत मोहिंदरसिंगाच्या पोटावर सरकारी डॉक्टरनं पहिला चाकू फिरवला. रक्तपेशींचा रंग भडक लाल होता. हत्याराने कवटी फोडली ! मेंदू आणि त्याला जोडणारे भाग आक्रसले होते. श्वास नलिकांची अवस्था तीच ! फुफ्फुसातील रक्त साकळलेले. उजव्या बाजूच्या छातीच्या पिंजऱ्यात रक्ताचा लोट; यकृत, प्लिहा, आणि मूत्रपिंडं आक्रसलेली...

प्रत्येक धंद्याची नजरेची एक भाषा असतेच ! 'एकूण लक्षणांवरून मरण नैसर्गिक नाही', हा भाव सरकारी डॉक्टरांच्या नजरेत उमटला. खाजगी डॉक्टरनं त्यांच्या नजरेतला हा भाव टिपला आणि ते पुढे काय होतं ते पाहू लागले.

सरकारी डॉक्टरने अन्न-नलिका कापली. त्यात १६ औंस न पचलेलं अन्न सापडलं ! खाजगी डॉक्टरचं समाधान झालं. ते 'अन्न' किमयाशास्त्र विच्छेदन तज्ञाकडे पाठवण्यात आलं. (Chemical Analysis).

...पंजाबमधे अंबाल्यात एकच सरकारी किमयाशास्त्र विच्छेदन तज्ञ होता. तो पण सरकारी नोकर ! आधी आलेली कामं करता करता मोहिंदरसिंगाच्या अन्न-नलिकेचे विच्छेदन बरंच लांबलं. त्याने रिपोर्ट मात्र बरोबर दिला 'अन्नात सायनाईड हे जालीम वीष होतं.'

१० फेब्रुवारी १९५७ ला मोहिंदरसिंगाच्या शवाचं विच्छेदन झालं आणि 'लाल फिती'मुळे १८ फेब्रुवारी १९५७ ला केमिकल ॲनलायझरचा रिपोर्ट आला ! मधे ?

पोलीस तपास चालू आहे !

...१ मार्च १९५७ पर्यंत, सब इन्स्पेक्टर जसवंतसिगानी कुणालाही अटक केली नाही. फक्त सायनाईड सापडलं. याची पोलीस दप्तरी नोंद झाली.

...मधल्या काळात सौ. भारद्वाज स्वस्थ बसली नव्हती. बरोबर १ मार्च १९५७ ला आय. जी. पी. ला (डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, स्टेट पंजाब) पत्र पाठवलं.

सन्माननीय महोदय,

काय चाललंय तुमच्या पोलीस खात्यात ? माझा भाचा मोहिंदरसिंग अचानक आणि संशयास्पद स्थितीत मेला; तरी यमुनानगर पोलीस स्टेशनने नीट चौकशी केली नाही ! खरी गोष्ट अशी आहे : धर्मवीरसिंग आणि रामकिशन, हे दोघं त्याला दारू प्यायला घेऊन गेले. हॉटेलमध्ये दहा मिनिटात माझा भाचा मेला. पोलीस आले पण चौकशी नीट केली नाही. कृपया या बाबतीत लक्ष घालावे.

—३ मार्च १९५७ला भगवतीदेवी (मोहिंदरसिंगाची पत्नी ! ) हिने आय. जी.पी.ला अर्ज केला. तिचा आरोप तर सरळ होता. " पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे माझ्या नवऱ्याचे खुनी, धर्मवीरसिंग आणि रामकिशन अजून मोकळे आहेत. राज्य आहे का काय आहे? धर्मवीरसिंगाचं आणि माझ्या नवऱ्याचं वाकडं होतं,कारण अनेक आहेत. (१)माझ्या यजमानांनी धर्मवीरसिंगाविरुद्ध कोर्टात जाऊन त्याच्याविरुद्ध रु. ७,७००ची डिक्री मिळवली होती. ती आता बजावयाची बाकी आहे. (२) धर्मवीरसिंग माझ्या नवऱ्याची बंदूक घेऊन गेला होता ती तो जाम परत करीत नव्हता, जेव्हा पोलिसात तक्रार दिली तेव्हा त्याने ती साळसूदपणे आणून दिली. (३) धर्मवीरसिंगाने आपली वडलोपार्जित मिळकत उडवून टाकली आणि त्याच्या मुलाचा शेअर तो विकायला बघत होता पण त्याच्या मुलाने दाद दिली नाही. त्याच्या मुलाला माझ्या नवऱ्याने भडकवला असा त्याला संशय होता साहेब ! आम्ही गरिबांनी कुणाकडे पहायचं. इथले पोलीस काही लक्ष देत नाहीत. तुमच्या मुलीवर किंवा बहिणीवर असा अन्याय झाला असता तर ? मेहेरबानी करून लक्ष घाला. ही विनंती "

...हे पत्र वाचून, विशेषतः शेवटचं वाक्य वाचून आय. जी. पी. चिडला ! पोलीस कचेऱ्यांतून फोन्स सुरू झाले. खालच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यास सुरुवात झाली, आणि आता पोलीस इन्स्पेक्टर सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगाना विचारत होते, " नालायक ! काय चाललाय हे ? तुझ्या बहिणीवर किंवा मुलीवर कुणी असा अन्याय केला असता तर ! किती वर्षं नोकरी झाली पोलीस खात्यात ? कधी कधी फिर्यादीच आरोपी असतो हे अजून शिकला नाहीस? ब्लडी बास्टर्ड ! तुझ्यामुळे आय. जी. पी. पर्यंत आपल्या पोलीस स्टेशनची अब्रू गेली ! का केलंस असं बोल ! सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगसुद्धा गव्हर्मेंट सव्हंट ! वरचा साहेब बोलला तर ऐकून घ्यायचं आणि सोडून द्यायचं. त्यांना तसं बोलावंच लागतं. खाडकन सलाम ठोकून त्यानं पोलीस इन्स्पेक्टरला समजावलं, ' साहेब !

जरा माझं ऐकून तर घ्या ! पोलीस खात्यात केस घ्यावी तर पैसे खाऊन मला गुंतवला असा आरोप येतो आणि कुणाला अटक केली नाही तर 'पैसे खाऊन' सोडला असा आरोप येतो. मग काय करायचं ? आरोपींना अटक करण्यापूर्वी त्यांच्या विरुद्ध पुरावा नको ? मी काय करणार ? या केसमध्ये माझी काही चूक नाही !"

सिगरेट पेटवीत पोलीस इन्स्पेक्टरने सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंगांना दरडावलं.

'पुरावा आणून देणारी पत्रं आलेली आहेत, प्रथम आरोपींना अटक करा ! ती पत्रं वाचा ! जाऽऽव ! जल्दी.'

...अशा तऱ्हेने १८ मार्च १९५७ ला धर्मवीरसिंग आणि रामकिशनला अटक झाली ! पुरावा काय ? तर फक्त आलेली पत्रं आणि मोहिंदरसिंग मेला तेव्हा त्याच्या जवळ ते होते ! अजूनही ही केस संशयास्पद होती. आता पोलीस पुरावा गोळा करायला लागले ! आधी फाशी मग चौकशी ! यमुनानगर पोलीसस्टेशन कडून केमिकल ॲनलायझरला मेमो गेला, की 'मोहिंदरसिंगाच्या पोटात कुठल्या प्रकारचं सायनाईड मिळालं ते कळवा !'

मोहिंदरसिंगाच्या प्रेताच्या पोटात सापडलेल्या ५·६ ग्रॅम अन्नाचं पुन्हा विच्छेदन झालं. उत्तर आलं, पोटॅशियम सायनाईड !

दरम्यान पंजाबमधल्या 'संध्याकाळ'मध्ये बातमी आली.

"विषारी नागांना अटक !" ईव्हिनिंग न्यूज म्हणत होता. "गूढ मृत्यूची उकल झाली ! दोघांना अटक !"

रात्रीचे साडेबारा एक झाले असतील. सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी हुकूम सोडला. "हवालदार धर्मवीरसिंगला 'चौकशी'च्या खोलीत घ्या !"

धर्मवीरसिंगला चौकशीच्या खोलीमध्ये आणले. तिथलं एकूण वातावरण बघून तो थोडा घाबरला. पण वरून शांत होता ! त्याच्या एक सणसणीत कानफटात देऊन सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंग गरजले, "मी विचारतो त्या प्रश्नांना सरळ उत्तरं देशील तर ठीक नाहीतर याद राख. पोलीसी हिसका दाखवावा लागेल."

गाल चोळीत धर्मवीरसिंग म्हणाला, "साहेब ! मी काही केलंच नाही तर उगाच कशाला खोटं बोलू साहेब !"

"मग बोल ! मोहिंदरसिंगने तुझ्या विरुद्ध ७,७०० रुपयांची डिक्री मिळवली होती हे खरं ना ?"

"नाही साहेब ! उलट माझ्या वडिलांनी त्याच्या विरुद्ध ७,७०० रुपयांची डिक्री आणली होती !"

"तू त्याची बंदूक का नेली होतीस ?"

"शिकारीसाठी !"

"...ती बंदूक तू परत करत नव्हतास. त्याला पोलीस कंप्लेंट द्यावी

लागली ?"

"नाही साहेब ! खोटी गोष्ट ! माझ्याविरुद्ध तशी तक्रार नाही !'

"तुझ्या मुलाचा आणि त्याचा संबंध जवळचा होता ना ?"

"होता ! कारण तो पिणारा आणि माझा पोरगापण पिणारा !"

"म्हणून तुझा त्याच्यावर राग होता ?"

"असणारच !"

"म्हणजे तुझं आणि त्याचं वाकडं होतं तर !"

"नाही साहेब ! उलट तो पितो याची मला कीव यायची. अहो ! नात्यातली भांडणं ती ! पाण्यावर काठी आपटली म्हणून काय पाणी दुभंगतं ? तो माझ्याकडे यायचा दारुच्या आशेने !"

"म्हणजे तूपण पितोस तर !"

"कोण पीत नाही साहेब ? दुनिया पिते ! पण मी त्याच्यासारखी पीत नाही. एखाददिवशी घ्यायची. नाहीतर अजिबात नाही !"

.. सब इन्स्पेक्टर जसवंतसिंग पुन्हा चक्रावले. या प्रश्नोत्तरातून मिळालेली माहिती कितपत खरी ते पडताळून पाहिल्याशिवाय त्याला आणखी मारण्यात अर्थ नव्हता. ते मागे वळून पहात ओरडले "हवालदार ! घेऊन जा याला."

दुसऱ्या दिवशी यमुनानगरच्या प्रथम वर्ग दंडाधिकारी (1st Class Judicial Magistrate) यांच्या कोर्टात लोकांची बरीच गर्दी झाली. धर्मवीरसिंग व रामकिशनला पाहण्यासाठी ! उलटसुलट चर्चा चालू होती.

"अरे ! आपला मोहिंदरसिंग मेला !"

"मेला म्हणजे मरणारच होता ! बेवडा प्यायचा अख्खा दिवस आणि वर काही खात नसे."

"तसं नाही रे ! या हरामखोरांनी त्याला दारूमधून वीष दिलं म्हणे."

"कोण म्हणतो तसं, पोलीस ना ? साले, ते काय कमी आहेत, हप्ता ख ातात फुकट दारू पितात, भानगड झाली म्हणजे कुणालाही धरून आणतात !

...घड्याळाचा काटा अकरावर सरकला, 'सायलेन्स !' असा शिपायाचा आवाज आला. लोकांची आपसातली बडबड बंद झाली. न्यायमूर्ती आपल्या इतमामात येऊन न्यायासनावर बसले. ज्युडिशिअल क्लार्कने वरून हुकूम केला. "चला हवालदार ! रिमांड घ्या ! यमुनानगर पोलीस स्टेशन !"

सगळ्यांची धांदल उडाली. सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगांनी पिंजऱ्यात जाऊन मॅजिस्ट्रेट साहेबांना खाडकन् सलाम ठोकला. मॅजिस्ट्रेटने मान हलवून तो स्विकारला आणि कोर्टाचं काम पुढं सुरू झालं.

"धर्मवीरसिंग."

"आहे !"

" रामकिशन."

" आहे!"

पोलीस बंदोबस्तात दोन्ही आरोपीना मॅजिस्ट्रेटपुढे आणण्यात आले.

न्यायमूर्तींनी सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगाकडे पहात विचारले, " यस् ? काय चार्ज आहे."

" मर्डर सर! ३०२ I. P. C. !" आरोपींना जामीन देऊ नका...इतक्यात वकीलाचा बुलंद आवाज आला. " आरोपीना जामीन द्या! हा घ्या माझा लेखी अर्ज. आरोपींना फक्त संशयावरून अटक झाली आहे. तो दुर्दैवी मनुष्य दारू प्यायचा! विचारा सब इन्स्पेक्टर साहेबांना हे खरं आहे की नाही? तो मेला ९ फेब्रुवारी १९५७ ला. चौकशी करा म्हणून पहिली खबर (First Information) दिली. ती माझ्या अशिलानी! खुनी मनुष्य स्वतःच पोलीसला खबर देतो? या सब-इन्स्पेक्टरनं स्वतःच्या हातांनी केस क्लोज केली आणि कुणीतरी वर अर्ज केला म्हणून ओपन केली! आरोपींना अटक झाली ती १८ मार्चला. मी तर म्हणतो आता तरी पोलिसांकडे पुरावा काय आहे, तो त्यांनी सांगावा. उगाच खांद्यावर फिता आणि स्टार आहेत म्हणून कुणालाही अटक करण्याचा याना अधिकार नाही! वाटल्यास भारी किंमतीचा जामीन द्या. माझे अशील सकाळ-दुपार संध्या-काळ पोलीस स्टेशनला हजेरी देतील! पण जामीन द्या. बेगुन्हा माणसं यांच्या ताब्यात नकोत! दॅटस ऑल युवर वर्शिप!"

मॅजिस्ट्रेट साहेबानी पुन्हा सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगाकडे पाहिले. ते घाम पुसत होते! त्याना कुठून चंद्रबळ आलं कुणास ठाऊक? ते कसंबसं बोलले. " साहेब! वकीलसाहेबांचं म्हणणं खरं आहे. जेव्हा त्यांच्याविरुद्ध पुरावा नव्हता. तेव्हा मी अटक केली नव्हती. नंतर मृत मोहिंदरसिंगाच्या आत्याची आणि बायकोची पत्रं आली. त्यातला मजकूर कितपत खरा आहे याची खातरजमा करण्यासाठी वेळ लागेल......"

...वकीलसाहेब पुन्हा उठले. त्यांना हाताने खूण करून खाली बसवीत मॅजिस्ट्रेट-साहेब सब इन्स्पेक्टर जसवंतसिगना म्हणाले, " ठीक आहे! १४ दिवस आरोपी तुमच्या ताब्यात देतो! पुढच्या वेळेला मात्र तुम्ही आरोपीविरुद्ध सबळ कारण दाखवलं नाही तर आरोपीना जामीन देईन!"

...कोर्टाचा हवालदार ओरडला!

" ४ एप्रिल, पोलीस कस्टडी!"

पेपरला बातमी झळकली. " धर्मवीरसिंग आणि रामकिशन यांचा जामिनाचा अर्ज फेटाळला!"

सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगाची धावपळ झाली. यमुनानगर पोलीस स्टेशनची

जीप आता फिरत होती ती धर्मवीरसिंग कितपत खरं बोलला ते पडताळून पाहण्यासाठी...आणि अहो आश्चर्यम् ! धर्मवीरसिंग खरं बोलला ! मोहिंदरसिंगाविरूद्ध धर्मवीरसिंगच्या बापाने ७,७००।– रुपयाची डिक्री आणली होती ! धर्मवीरसिंग बंदूक परत देत नाही अशी तक्रार मोहिंदरसिंगाकडून कुठल्याही पोलीस स्टेशनला नव्हती ! धर्मवीरसिंगाचा मुलगा स्वतःच असं म्हणाला " छे: ! छे: ! साहेब कुणाचं ऐकून मी बापाच्याविरुद्ध जाईन ? मोहिंदरसिंगाची आणि माझी दोस्ती होती ती फक्त दारू पिण्यासाठी !"

जसवंतसिंग पुन्हा संभ्रमात पडले. त्यांची परिस्थिती 'जैसे थे!' होती. आरोपीविरुद्ध पुरावा काही नाही ! केस घ्यावी तरी पंचाईत न घ्यावी तरी पंचाईत ! वैतागून ते पोलीस स्टेशनला आले ...आणि टेलिफोन खणखणला. फोन असिस्टंट कमिशनरचा होता, 'कमिशनर साहेबांनी, तुम्हाला आणि पोलीस इन्स्पेक्टरला आत्ताच्या आत्ता बोलावलंय.'

माणसाचं नशीब कसं असतं बघा ! कधी कधी गोष्टी नकळत चांगल्या घडत असतात आणि आपल्याला वाटतं काहीतरी वाईट होतय् ! जसवंतसिंग उगाचच घाबरले. आता पोलीस कमिशनर ओरडणार ! त्यानी राजीनामा टाईप केला. 'नको ही सरकारी नोकरी ! सालं वाईट करावं तर वाईटपणा आहेच पण चांगलं करावं तरी वाईटपणा ? रस्त्यावर बसून भीक मागेन पण पोलीस खात्यात नोकरी नको !' पोलीस इन्स्पेक्टर चांगला होता. त्यानं जसवंतसिंगना समजावला, 'हे बघ ! सरकारी नोकरीत वरच्या ऑफिसरकडुन लेखी ऑर्डर घ्यावी आणि आपलं काम करावं. तोंडी बोलला तर मनाला लावून घेऊ नये!' आणि यमुनानगर पोलीस स्टेशनची जीप पोलीस इन्स्पेक्टर आणि सब इन्स्पेक्टरना घेऊन अंबाल्याच्या दिशेने सुसाट निघाली.

... ऑफिस ऑफ द कमिशनर ऑफ पोलीस, अंबाला ! दोघांनी तुळतुळीत दाढया केल्या होत्या. बुटाना पॉलिश, कपडे कडक ! घाबरत दोघेही आत शिरले. पोलीस कमिशनरने मुद्दामच करडया आवाजात विचारलं.

" मोहिंदरसिंग, मर्डर केसच काम कुठपर्यंत आलं "

" इन्स्पेक्टर थरकला ! जसवंतसिंगाकडे बोट दाखवीत तो म्हणाला,

" ते यांना माहिती !"

जसवंतसिंगानी कमिशनरला कडक सलाम ठोकला. आणि नम्रपणाने सांगितलं.
" साहेब ! आरोपी विरुद्ध पुरावा मिळत नाही. मी प्रामाणिक प्रयत्न करूनदेखील ! वाटल्यास आपण मला पोलीस खात्यातून काढून टाका पण वाईटपणा देऊ नका !"

... कमिशनरसाहेब मनमुराद हंसले ! आणि एकदम उठून जसवंतसिंगाच्या हातात एक लखोटा ठेवीत, त्यांच्या खांद्यावर शाबासकी देत ते म्हणाले, " यंग बॉय ! जामिनावर जाऊ दिलं नाहीस ! गुड ! आता हा पुरावा तर खोटा नाही ?

ही केस सरकारच्या बाजूनं झाली तर मी तुला १०० रुपये बक्षीस देईन. जाऽव !
... जीपव्हॅन अंबाला ते यमुनानगर आनंदात आली ! जसवंतसिगानी ते पत्र वाचलं, सॉलीड पुरावा ! "आज रात्री साल्याना बघतो मी !" अशा विचारात जसवंतसिग होते ! कुणाचं होतं ते पत्र ? काय होता पुरावा ?

□ □

खुद्द पोलीस कमिशनर, अंबाला, यानी सब इन्स्पेक्टर जसवंतसिग यांच्या हातात ठेवलेले पत्र लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचे ब्रँच मॅनेजर प्रभाकर याच होतं. पत्रातला मजकूर असा होता.

**गोपनीय** (Confidential)

कमिशनर ऑफ पोलीस,

अंबाला, यांस

सर,

मोहिंदरसिग नावाच्या यमुनानगरच्या इसमाने आमच्याकडे रु. १,७५,०००।– इतक्या रकमेचा विमा उतरला होता. त्याचा पहिला हप्ता रु. ५,९२६ (पाच हजार नऊशे पंचवीस अक्षरी) धर्मवीरसिगने चेकने भरला आहे. याच धर्मवीरसिगाचं आम्हाला पत्र आलं आहे, की मोहदरसिग हार्ट ॲटॅकने मेला ! धर्मवीरसिग मोहिंदरसिगाचा नॉमिनी आहे. आणि तो रु. १,७५,०००।– इतक्या रकमेची मागणा करतो आहे. एवढेच नव्हे, तर सर्व पत्रव्यवहार त्याच्याच पत्त्यावर व्हावा असंही त्याचं लेखी पत्र आहे. विमा उतरल्यानंतर अवघ्या दोन महिन्यात क्लेम आला ! म्हणून आम्हाला शंका आहे. तरी कृपया मोहिंदरसिग कसा मेला ? याची चौकशी व्हावी.

आपला

प्रभाकर

ब्रँच मॅनेजर, एल. आय. सी. अंबाला

उशीरा का होईना ? पण पोलीस खातं हललं !

...रात्रीचे १२॥ वाजले होते. पोलीस स्टेशनवर आता कुणी नव्हतं. जसवंतसिगानी हुकुम सोडला "हवालदाऽऽर ! त्या धर्मवीरसिगला आणा"

चौकशीच्या खोलीत जसवंतसिग आणि ५–१० हवालदार धर्मवीरसिगला तुडवत सुटले. तो केकटत होता. "काय साहेब ? उगच मारता ? मोहिंदरसिग कसा मेला ते मला माहीत नाहीऽनाहींऽऽनाहीऽऽऽ ! मला काय सांगायच होत ते मी खरं सांगितलं !"

"मग आतापण खरं बोल !"

" बोलतो."

" मोहिंदरसिंगनी विमा उतरला होता ?"

" असेल! मला काय माहीत ?"

" हवालदार! मार कानफटात म्हणजे समजेल त्याला!"

" नाही साहेब! मारू नका त्यानं विमा उतरला होता!"

" कितीचा ?"

"..... ......"

सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी धर्मवीरसिंगचा फेटा सोडला! केस धरून त्यानी त्याला हलवीत विचारलं " बोलऽऽकितीचा ?"

" १,७५,००० रुपयांचा!"

" हे तुला कसं कळलं ?"

" त्यानी मला सांगितल होतं"

त्याच्या कंबरड्यात लाथ मारून जसवंतसिंग ओरडले " नाही! तू नॉमिनी होतास. पहिला ५,९२५ रुपयांचा हप्ता तू चेकनं दिलास! L. I. C. बरोबर पत्रव्यवहार केलास. परवा तूच बोलला होतास ना, की 'नात्यातली भांडण महत्त्वाची नसतात.' आता पोलीस अंमलदार म्हणून तुला सांगतो, 'नात्यातलीच भांडणं महत्त्वाची असतात. बायको आणि मुलं असताना एक लाख पंचाहत्तर हजार रुपयांचा नॉमिनी तुला त्यानं केला? विमा उतरल्यावर दोन महिन्यात तो मेला? अचानक? नालायक! तू त्याच्या दारूचा फायदा उठवलास! हवालदार! धोपटा आणखीन!

...खूप मार खाल्लेला धर्मवीरसिंग रडत भेकत दोन कॉन्स्टेबलसच्या मदतीने लॉकअपमधे परत जात होता. आणि इकडे जसवंतसिंगाचा हुकूम सुटला " याला आत टाका आणि रामकिशनला घेऊन या!" रामकिशने धर्मवीरसिंगाची 'हालत' पाह्यली. तो घाबरला. रामकिशन आत येताच जसवंतसिंगानी त्याच्या कानफटात मारली. साहेबानं मारल्यावर हवालदार थांबणार? त्यांनी पण तोच कार्यक्रम चालू केला.

" बोऽऽल! मोहिंदरसिंग कसा मेला ?"

" साहेब! मारू नका! मी खरं सांगतो, आम्ही मारला!"

" आम्ही म्हणजे कुणी ?"

" मी आणि धर्मवीरसिंगनी!"

" कसा मारला ?"

" आम्ही त्याला पाजली! आणि त्याचा विमा उतरवला. त्यानं धुंदीत सही केली. नंतर आम्ही दीड महिना थांबलो आणि सहारानपूरहून (यमुनानगर पासून ५० मैल दूर!) पोटॅशियम सायनाईड आणलं!

" हूं ऽऽ बरोबर आहे. पुढे बोल ! कुणाकडून आणलं ?"

" संतसिंगाकडून "

" काय काम करतो तो ?"

" डॉ. बुधवार आणि बंधू या केमिस्टचा नोकर !"

" वीष तो वाटेल त्याला देतो ?"

" नाही साहेब ! डॉ. बुद्धदेव यांना धर्मवीरसिंगानी सांगितलं."

" काय सांगितलं ?"

" डॉक्टरसाहेब मला फोटोग्राफीसाठी पोटॅशियम सायनाईड पाहिजे तुम्ही चिठी द्या !"

" तू का गेलास ?"

" मी आजारी होतो आणि डॉ. बद्धदेव यांचं औषध मला चालू होतं. पण गुण येत नव्हता. डॉक्टर बुद्धदेव स्वतःच मला बोलले, की " आपण डॉ. बुधवार आणि बंधू यांच्या दुकानात जाऊ. डॉ. बुधवार स्वतः चांगले डॉक्टर आहेत, त्यांचे भाऊ केमिस्ट आहेत. आपण तिथेच औषध घेऊ !"

" मग पुढे ?"

" पुढे धर्मवीरसिंगाला हे कळलं. तो मला म्हणाला, 'तुला दहा हजार रुपये देईन. मोहिंदरसिंगला उडवायचा !' म्हणून मी त्याला मदत केली."

" काय मदत केलीस ?"

" पार्टीची योजना माझी ! मी त्याला पार्टीला बोलावला. आम्ही तिघं निघालो. दुपारी पिक्चर बघितलं. रात्री त्याला प्यायला घेऊन गेलो. त्याला लघवीला लागली. तो थोडावेळ गेला. तेवढ्यात धर्मवीरसिंगने मला डोळा मारला आणि त्याच्या दारूत पोटॅशियम सायनाईड ओतलं. मोहिंदरसिंग आला. जेवायला बसला आणि मेला !"

हातातला दांडा सवईप्रमाणे आपल्याच हाताच्या डाव्या पंजावर आपटत जसवंतसिंग ओरडले, 'हे सगळं कोर्टात सांगशील ?'

" सांगेन ? खरं बोलायला भिती कुणाच्या बापाची ?"

" एऽऽऽबाप काढू नको. जर का कोर्टात खरं नाही बोललास तर तुला परत आत घेईन आणि मग तुला तुझा बाप आठवेल ! हवालदार ! घेऊन जा याला; मारायचा नाही ! आपला साक्षीदार आहे !"

रामकिशन बचला. ४ एप्रिल १९५७ ! प्रथमवर्ग दंडाधिकारी यांचे कोर्ट. आज सरकारी वकील जोरात होते. (Police Prosecutor) त्यानी कोर्टाला लेखी अर्ज दिला की, " धर्मवीरसिंगला जामीन देऊ नका ! त्याच्याविरुद्ध पुरावा आहे ! हे बघा ब्रँच मॅनेजर प्रभाकर यांचं पत्र ! शिवाय आरोपी नंबर दोन कबुली जबाब द्यायला तयार आहे. तो कृपया आजच घण्यात यावा त्याला, मर्यादित माफी

(Conditional Pardon) देण्यात यावी !"

मॅजिस्ट्रेटने हुकूम दिला. "रामकिशनला पिंजऱ्यांत बोलवा !'

रामकिशन पिंजऱ्यात शिरला. मॅजिस्ट्रेट साहेबांना सलाम करीत तो बोलला, "साहेब ! मी खरं सांगायला तयार आहे !"

"पोलिसांच्या भीतीने का स्वतःच्या इच्छेने ?"

"माझ्या खुषीने !"

"असं ? गुन्हा करून वर खरं बोलतोस ? स्वतःला कोण समजतोस तू ? संत—महात्मा ?

रामकिशन गोंधळला ! काय उत्तर द्यावं त्याला कळेना ! कसबसं बोलला, "नाही साहेब ! होणारी गोष्ट होऊन गेली. पण नंतर मला वाटलं, की खरं बोलावं ! वाईट माणसात पण काही चांगले गुण असतात साहेब !"

"तुला माहीत नसेल म्हणून सांगतो की तू जे काही बोलणार आहेस; ते इथं लिहिलं जाणार आहे आणि तुझ्याविरुद्ध पुरावा म्हणून ते कागद वापरण्याचा अधिकार सरकारला आहे. सांगायचंय काही !"

"होय साहेब !"

"चला ऽऽ ! पोलीस ऑफिसर्स आणि हवालदार, कोर्टाच्या बाहेर जा !"

मॅजिस्ट्रेटसाहेबांचा हुकूम पाळला गेला. आणि रामकिशन बोलायला लागला ! धर्मवीरसिंगने मोहिंदरसिंगला कसा मारला ते रामकिशनने सांगितले ! मॅजिस्ट्रेटसाहेबांनी स्वतःच्या हस्ताक्षरात ते लिहून घेतलं. रामकिशनला ते वाचून दाखवलं आणि त्यानंतर "बरोबर आहे ना ?" असं विचारून त्याची खाली सही घेतली. रामकिशनला जामीन मिळाला. रुपये ५००० चा. शिवाय सकाळ संध्याकाळ यमुनानगर पोलीस स्टेशनला हजेरी द्यायची. जसवंतसिंग खूष झाले. धर्मवीरसिंग शांत होता ! धर्मवीरसिंगाला नो-बेल, पोलीस कस्टडी तारीख ? १८ एप्रिल !

...मधल्या काळात सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगांनी डॉ. बुधवार आणि बंधू या कंपनीवर धाड मारली ! त्यांचं कॅशमेमो बुक सरकारजमा झालं. पंचांच्या देखत, संतसिंग आणि डॉ. बुद्धदेव यांची स्टेटमेंटस् घेतली आणि १८ एप्रिल १९५७ ला चार्जशीट दिलं. मॅजिस्ट्रेटसाहेबानी एकंदर पुरावा बघून धर्मवीरसिंगावर चार्ज ठेवला. "मी, X Y. Z. मॅजिस्ट्रेट प्रथमवर्ग दंडाधिकारी, तू. धर्मवीरसिंग, तुझ्यावर आरोप ठेवतो, की दिनांक ९ फेब्रुवारी १९५७ ला रात्री ९—३० ते १०—३० च्या दरम्यान मोहिंदरसिंग नावाच्या इसमाचा जाणूनबुजून आणि हेतुपुरःसर खून केलास आणि इं. पि. को कलम ३०२ प्रमाणे गुन्हा केलास !"

...आता सरकारी वकील उभे राहिले ! त्यांना खाली बसवीत मॅजिस्ट्रेटसाहेब बोलले, "नो आर्ग्युमेंट प्लीज ! चार्ज शीट मी नीट वाचलं आहे. आरोपीविरुद्ध पुरावा आहे. निदान सकृत्दर्शनी तरी आहे."

...आणि त्या दिवशी संध्याकाळी वृत्तपत्रं विकणारी पोरं ओरडत सुटली.

"मोहिंदरसिंग खून खटला सेशन कमिट झाला !"

(क्रमशः)

कमी मिळाली. त्यामुळे समाजवादी पक्षास ही जागा टिकविणे कठीण जाईल.

राजापुरमध्ये प्र. स. पक्ष १९६७ साली काँग्रेसपेक्षा ११,७०० मते अधिक मिळवून विजयी झाला होता. लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीतही पक्षाला काँग्रेसपेक्षा ५९०० मते अधिक मिळाली होती. हे लक्षात घेता ही जागा समाजवादी पक्षाला मिळण्याची बरीच शक्यता आहे.

'लांजा'च्या जागेबाबत मात्र तशी खात्री देता येत नाही. प्र. स. पक्षाने १९६७ मध्ये ४००० मतांनी ही जागा जिंकली हे खरे पण लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत पारडे फिरून या मतदारसंघात काँग्रेसने ३२०० मते अधिक मिळविली. अशा परिस्थितीत ही जागा टिकविणे समाजवादी पक्षास जड जाईल.

मालवणची जागा प्र. स. पक्षाने १९६७ च्या निवडणुकीत अवघ्या २१०० मतांनी गमावली, पण लोकमताचा कल गेल्या चार वर्षांत प्र. स. पक्षाकडेच अधिक झुकल्याचे लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीवरून दिसून आले. प्र. स. पक्षाने या भागात यावेळी काँग्रेसपेक्षा ५७०० मते अधिक मिळविली. ही परिस्थिती लक्षात घेता ही जागा समाजवादी पक्षाला मिळण्याचा बराच संभव आहे.

समाजवादी पक्ष रत्नागिरी जिल्ह्यात याशिवाय सावंतवाडी व संगमेश्वर या दोन जागा लढवीत असला तरी त्या भागात काँग्रेसचाच जोर अधिक असल्याचे १९६७ व १९७१ च्या लोकसभा निवडणुकीवरून दिसत असल्याने तेथे समाजवादी पक्षास विजयाची शक्यता नाही.

ठाणे जिल्ह्यात वसई, पालघर व कासा या जागा समाजवादी पक्ष लढवीत आहे. यापैकी पालघरची जागा १९६७ च्या निवडणुकीत प्र. स. पक्षाने ६३०० मतांनी जिंकली खरी, पण चार वर्षांत लोकमत काँग्रेसकडे झुकले व लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत काँग्रेसने या भागात अकरा हजारांवर मते जास्त मिळविली. हे लक्षात घेता समाजवादी पक्ष ही जागा टिकविण्याची शक्यता फार थोडी आहे.

कासाची जागा प्र. स. पक्षाने १९६७ साली अवघ्या २१०० मतांनी गमावली. त्यामुळे यावेळी आपण ती जिंकू असे त्या पक्षाला वाटत असले तरी १९७१ मधील लोकसभा निवडणुकीचे मतदान लक्षात घेता काँग्रेसचेच पारडे या भागात जड आहे असे स्पष्ट दिसते. काँग्रेसने प्र. स. पेक्षा दहा हजार मते अधिक मिळविली. अशा परिस्थितीत ही जागा समाजवादी पक्षाला जिंकणे कठीण जाईल.

वसई मतदारसंघात पुरवठामंत्री हरीभाऊ वर्तक आणि प्र. स. पक्ष यांच्यात सरळ सामना असल्याने निवडणूक चुरशीची होईल. पण या भागात काँग्रेसचाच अधिक जोर आहे. १९६७ ची निवडणूक काँग्रेसने ९२०० मतांनी जिंकली होती

आणि लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत विरोधी उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षा ५३ हजारावर मते काँग्रेसने जास्त मिळविली होती. अशा परिस्थितीत काँग्रेसलाच यशाची अधिक शक्यता आहे.

## मुंबई – जरा कठीणच

बृहन्मुंबईतील २८ जागांपैकी समाजवादी ८ जागा लढवीत आहे. १९६७ साली प्र. स. पक्षाने फक्त नायगावची जागा जिंकली होती. यावेळी नायगावशिवाय कुंभारवाडा, खेतवाडी, दादर, कुर्ला, वांद्रा, मालाड, घाटकूपर या सात मतदारसंघात समाजवादी पक्षाचे उमेदवार उभे आहेत. नायगाव मतदारसंघात १९६७ साली प्र. स. पक्ष व रिपब्लिकन पक्षाने काँग्रेसपेक्षा १५००० वर मते जास्त मिळविली होती. पण १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या भागात सर्व विरोधी उमेदवारांपेक्षा १२ हजारावर मते जास्त मिळविली. विरोधी पक्षात सर्वांत जास्त मते शिवसेनेने मिळविलेली आहेत. प्र. स. पक्षाचा उमेदवारच उभा नव्हता. रिपब्लिकन पक्षाच्या खोब्रागडे व कांबळे दोन्ही गटांना फारच थोडी मते मिळाली. ही परिस्थिती लक्षात घेता नायगावची जागा जिंकणे समाजवादी पक्षास कठीण जाईल. मालाड व वांद्रा मतदारसंघात १९६७ साली प्र. समाजवादी व सं. समाजवादी पक्षांना मिळून काँग्रेसपेक्षा थोडी अधिक मते मिळाल्याने या जागा लढविण्याचे समाजवादी पक्षाने ठरविले असले तरी लोकसभा निवडणुकीतील मतदान पाहता काँग्रेसच्या तुलनेने विरोधी पक्षांना फारच कमी मते पडली आहेत. या दोन्ही मतदारसंघात समाजवाद्यांपेक्षा संघटना काँग्रेसचा जोर अधिक होता. पण डॉ. शांती पटेल व त्यांचे अनुयायी सत्तारूढ काँग्रेसला मिळाल्याने तो जोरही आता ओसरला आहे. अशा परिस्थितीत या जागा समाजवाद्यांना मिळण्याचा संभव नाही. बाकीच्या पाच मतदारसंघातही काँग्रेसच्या तुलनेने विरोधी पक्षांना लोकसभा निवडणुकीत फारच कमी मते पडली हे लक्षात घेता काँग्रेसलाच या जागा जिंकणे सोपे जाईल.

मुंबई व कोकणशिवाय बाकीच्या पश्चिम महाराष्ट्रात शिंदखेडा, एरंडोल पाचोरा, मावळ, मालेगाव, अकोले (नगर) जुन्नर, मुळशी, हवेली, इंदापूर, बारामती, पुरंदर आणि पुणे शहरातील कसबा, भवानी व लष्कर या जागा समाजवादी पक्ष लढवीत आहे. यांपैकी पाचोरा मतदारसंघात १९६७ च्या निवडणुकीत प्र. स. पक्ष व संयुक्त समाजवाद्यांची एकत्रित मते काँग्रेसपेक्षा १९००नी जास्त असली तरी लोकसभा मुदतपूर्व निवडणुकीत काँग्रेसने याच भागात या दोन पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षा १८ हजारांवर मते जास्त मिळविली आहेत. हे लक्षात घेता ही जागा समाजवादी पक्षाला मिळण्याचा संभव बराच कमी आहे. जुन्नर मतदारसंघात १९६७ मध्ये संयुक्त समाजवादी व प्र. स. पक्षाची एकत्रित मते काँग्रेसपेक्षा थोडी जास्त आहेत हे खरे, पण गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या भागात या दोन्ही पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षा बारा हजारांवर मते जास्त मिळविली. हे

लक्षात घेता समाजवादी पक्षाला ही जागा जिकणे कठीण जाईल. पुणे शहरातील कसब्याची जागा संयुक्त समाजवादी पक्षाने १९६७ साली ४१०० मतांनी गमावली. लोकसभा निवडणुकीत या भागात काँग्रेसने सर्व विरोधी पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षा जवळजवळ २९०० मते अधिक मिळविली. विरोधी पक्षांत सर्वांत जास्त मते जनसंघाने मिळविली. शिवसेनेलाही संयुक्त समाजवादी पक्षापेक्षा अधिक मते मिळाली ही परिस्थिती लक्षात घेता समाजवादी पक्षाला ही जागा मिळण्याचा संभव कमी आहे. पुणे लष्कर मतदारसंघातील निवडणूक १९६७ मध्ये चुरशीची होऊन संयुक्त समाजवादी पक्षाचा अवघा १९०० मतांनी पराभव झाला होता. पण गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने याच भागात सर्व विरोधी उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षा १७ हजारावर मते जास्त मिळविली. विरोधी पक्षांत सर्वांत जास्त मते जनसंघाला होती. ही परिस्थिती पाहता समाजवादी पक्षाला हीं जागा जिंकणे कठीण जाईल. पक्षाने पूर्वी ज्या जागा जिंकल्या किंवा जेथे चुरशीचा सामना दिला अशा जागांचाच येथे विचार केला. इतर ज्या जागा पक्ष लढवीत आहे, तेथे त्याचे बळ काँग्रेसच्या तुलनेने फारच कमी आहे.

## जामनेर : जागा का सोडली ?

पश्चिम महाराष्ट्रात जेथे आपले विशेष बळ नाही अशा जागाही समाजवादी पक्ष लढवीत असता जामनेरची जागा त्याने का लढवू नये याचे आश्चर्य वाटते. या मतदारसंघात १९६७ सालच्या निवडणुकीत प्र. स. पक्ष व संयुक्त समाजवादी यांची एकत्रित मते काँग्रेसपेक्षा फक्त २५०० कमी होती आणि गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत प्र. स. पक्षाला या भागात विजयी काँग्रेस उमेदवारापेक्षा फक्त १६० मते कमी मिळाली. समाजवादी पक्षाला ही जागा जिंकण्याची संधी होती.

मराठवाड्यामध्ये बिल्लोळी, देगलूर, जालना, दक्षिण कन्नड, केज व लातूर या सहा जागा समाजवादी पक्ष लढवीत आहे. यांपैकी जालना दक्षिण व लातूर या दोनच जागा संयुक्त समाजवादी पक्षाने १९६७ साली जिंकल्या होत्या. जालना दक्षिण मतदारसंघात संयुक्त समाजवादी पक्षाने काँग्रेसपेक्षा फक्त ११०० मते जास्त मिळवून विजय मिळविला. होता पण गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या भागात संयुक्त समाजवादी पक्षापेक्षा १८ हजार मते जास्त मिळविली. हे लक्षात घेता समाजवादी पक्षाला ही जागा टिकविणे कठीण जाणार आहे. लातूरची जागा संयुक्त समाजवादी पक्षाने १९६७ मध्ये ४४०० मतांनी जिंकली होती. पण १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या भागात संयुक्त समाजवादी पक्षापेक्षा १९ हजारावर मते अधिक मिळविली हीं परिस्थिती पाहता समाजवादी पक्षास यावेळी ही जागा टिकविणे कठीण जाईल. दुसरे, लातूरच्या विजयात काळदाते यांच्या कार्याचा व व्यक्तिमत्त्वाचा मोठा वाटा होता. यावेळचा उमेदवार तेवढा प्रभावी नाही. समाजवादी पक्ष लढवीत असलेल्या इतर जागांपैकी केजची जागा काळदातेच

तेथे उभे असल्याने समाजवादी पक्षाला मिळण्याचा संभव आहे. पण तेही सोपे नाही, कारण गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत या भागात सर्व विरोधी उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षा काँग्रेसने २५ हजारावर जास्त मते मिळविली हे विसरून चालणार नाही.

विदर्भात नागपूर पूर्व आणि आरमोरी या दोनच जागांसाठी समाजवादी पक्षाने उमेदवार उभे केले आहेत. यांपैकी आरमोरीची जागा संयुक्त समाजवादी पक्षाने १९६७ मध्ये २१०० मतांनी गमावली होती. पण गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने सर्व विरोधी उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षा १६००० वर मते या भागात जास्त मिळविली. विरोधी पक्षामध्ये समाजवाद्यांपेक्षा अधिक मते रिपब्लिकन पक्षाने मिळविली हे लक्षात घेता आरमोरीची जागा समाजवादी पक्षास मिळण्याचा संभव कमी आहे. नागपूर पूर्व भागात तर त्या पक्षाचे बळ फारच कमी आहे.

सबंध महाराष्ट्राचा एकत्र विचार करता वेंगुर्ला, राजापूर व मालवण या रत्नागिरी जिल्ह्यातील तीन जागा व मराठवाड्यातील केजची जागा एवढ्याच समाजवादी पक्षास मिळण्याची शक्यता दिसते.

## कम्युनिस्टांचे बळ !

समाजवादी पक्षानंतर विचार दोन्ही कम्युनिस्ट पक्षांचा. बृहन्मुंबईत उजवा कम्युनिस्ट पक्ष १० व मार्क्सवादी पक्ष ४ जागा लढवीत आहे. संबंध महाराष्ट्रात १९६७ साली कम्युनिस्ट पक्षाने दहा व मार्क्सवादी पक्षाने अवघी एक जागा जिंकली होती. कम्युनिस्टांनी बृहन्मुंबईत भायखळा, परळ व शिवडी या तीन जागा जिंकल्या होत्या. भायखळामध्ये २३००, परळमध्ये १०,६०० व शिवडीत ८९०० मतांची आघाडी त्यांना मिळाली होती. पण गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने कम्युनिस्टांवर भायखळा भागात १७ हजार, परळ भागात १५ हजार व शिवडी भागात २० हजार मतांची आघाडी मिळविली. परळची जागा शिवसेनेने पोट निवणुकीत जिंकली होती व लोकसभा निवडणुकीतही शिवसेनेने कम्युनिस्टांपेक्षा ८५०० अधिक मते मिळविली. शिवडी भागातही शिवसेनेचा जोर कम्युनिस्टांपेक्षा अधिक असल्याचे लोकसभा निवडणुकीत दिसून आले. शिवसेनेने या भागात कम्युनिस्टांपेक्षा १९०० मते अधिक मिळविली. ही परिस्थिती लक्षात घेता या तिन्ही जागा कम्युनिस्टांना यावेळी जिंकणे कठीण जाईल. बृहन्मुंबईत बाकीच्या ज्या जागा कम्युनिस्ट लढवीत आहेत तेथे त्यांचे बळ यापेक्षाही कमी आहे.

मार्क्सवाद्यांना १९६७ च्या निवडणुकीत बृहन्मुंबईत एकही जागा मिळाली नव्हती तरी यावेळी ते जागा लढवीत आहेत. वरळीची जागा त्यांनी गेल्या वेळी ४००० मतांनी गमावली. सरळ सामना असता तर ही जागा त्यांना मिळण्याचा संभव होता. पण यावेळी तेथे नऊ उमेदवारात लढत आहे. त्याचा फायदा निश्चितपणे काँग्रेसला मिळेल.



ही पहा
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि चोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात ? अं, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ? मग वापरतेस तरी काय तू ?
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर सगळं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डेट डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW def
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेंहि असो–अगदीं क्षारयुक्त असलें तरी !

कोकणातील तीन जिल्ह्यात फक्त खेडबंदरची जागा कम्युनिस्ट पक्ष लढवीत आहे. पण तेथेही त्या पक्षास फारसा पाठिंबा नाही. १९६७ साली पक्षाने तेथे आपला उमेदवारसुद्धा उभा केला नव्हता हे लक्षात घेता तेथे त्यास यशाची शक्यता फार थोडी आहे. मार्क्सवादी पक्ष कोकणात उल्हासनगर, भिवंडी, डहाणू, कासा व जव्हार या पाच जागा लढवीत आहे. गेल्या वेळी यांपैकी एकही जागा त्यांनी जिंकली नव्हती व यावेळीही परिस्थिती त्यांना अधिक अनुकूल आहे असे नाही.

मुंबई व कोकण सोडून बाकीच्या पश्चिम महाराष्ट्रात कम्युनिस्ट पक्ष १६ व मार्क्सवादी ६ जागा लढवीत आहेत. कम्युनिस्टांनी १९६७ मध्ये साक्री, धुळे दक्षिण व नगर–अकोला या जागा जिंकल्या होत्या. मार्क्सवाद्यांनी एकही जागा जिंकली नव्हती. गेल्या वेळी जिंकलेल्या तिन्ही जागांत साक्री ५४०० मतांनी, धुळे दक्षिण २३०० मतांनी व नगर–अकोला ९९०० मतांनी त्यांनी जिंकली होती. पण साक्री भागात गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने कम्युनिस्ट पक्षापेक्षा २५,००० मते अधिक मिळविली. जनसंघालाही कम्युनिस्टांपेक्षा १००० मते जास्त मिळाली. ही परिस्थिती लक्षात घेता साक्रीची जागा टिकविणे कम्युनिस्टांना कठीण जाईल. लोकसभा निवडणुकीत धुळे दक्षिण भागात काँग्रेसला सर्व विरोधी पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षा १५ हजार मते जास्त मिळालेली आहेत. कम्युनिस्ट उमेदवार उभा नसल्याने कम्युनिस्ट मते काँग्रेसलाच मिळाली असे गृहीत धरले, तरी १५००० चे अंतर मोठे आहे. ते भरून काढणे कम्युनिस्टांना सोपे नाही. नगर–अकोला भागातही लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने कम्युनिस्टांपेक्षा १० हजार मते अधिक मिळवून १९६७ मधील अंतर भरून काढले. ही परिस्थिती विचारात घेता कम्युनिस्टांना अकोल्याची जागा जिंकणे यावेळी कठीण जाईल.

पश्चिम महाराष्ट्रात कम्युनिस्ट पक्ष याशिवाय ज्या जागा लढवीत आहे, त्यांपैकी सोलापूर शहर (उत्तर) २९०० मतांनी व राहुरी ७८०० मतांनी गेल्या निवडणुकीत त्यांनी गमावली. सोलापूर शहर (उत्तर) भागात काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत विरोधी उमेदवारापेक्षा १८००० वर जास्त मते मिळविली. राहुरी भागात मात्र कम्युनिस्ट उमेदवार कडूंनी काँग्रेसपेक्षा २७०० जास्त मते मिळविली. तेच या भागातून उभे आहेत. कम्युनिस्टांचा या भागातील प्रभाव लक्षात घेता ही जागा त्यांना मिळण्याचा बराच संभव आहे. १९६७ मध्ये पाथर्डीची जागा अवघ्या १७०० मतांनी व पारनेरची जागा २३०० मतांनी कम्युनिस्टांनी गमावली होती. पण या जागा त्यांनी यावेळी लढविलेल्या नाहीत. याचे कारण लोकसभा निवडणुकीत पाथर्डी भागात काँग्रेसने सर्व विरोधी उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षा आठ हजार मते जास्त मिळविली होती व पारनेर भागात काँग्रेसला १७ हजार मतांची आघाडी मिळाली होती.

मार्क्सवादी पक्ष फलटण, सोलापूर (उत्तर), नाशिक, बागलाण, हातकणंगले व राधानगरी या जागा लढवीत आहे. पण त्यापैकी कोठेही त्यांचे विशेष बळ नाही.

मराठवाड्यामध्ये नांदेड, भोकर, बिल्लोळी, गंगापूर, कळमनुरी, पाथरी, माजलगाव, बीड, अष्टी, चौसाळा व औसा या ११ जागा कम्युनिस्ट लढवीत आहेत. यांपैकी कळमनुरी, अष्टी व चौसाळा या तीन जागा त्यांनी १९६७ मध्ये जिकल्या होत्या. कळमनुरीमध्ये ६५००, अष्टीमध्ये ९९०० व चौसाळामध्ये ११,७०० मतांची आघाडी त्यांना मिळाली होती. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत कळमनुरी भागात काँग्रेसने सर्व विरोधी पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षा ४००० वर मते जास्त मिळविली होती. कम्युनिस्ट उमेदवार उभा नव्हता. अष्टीमध्ये ३१००० व चौसाळामध्ये २८ हजार मतांची आघाडी काँग्रेसने मिळविली होती. हे विचारात घेता कम्युनिस्टांना या जागा टिकविणे कठीण जाईल व कम्युनिस्ट ज्या बाकीच्या जागा लढवीत आहेत तेथे त्यांचे बळ कमी आहे. बीडची जागा कम्युनिस्टांनी १९६७ मध्ये फक्त ८०० मतांनी गमावली होती. पण लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने कम्युनिस्टांपेक्षा २५००० मते अधिक मिळविली. गेवराईची जागा कम्युनिस्टांनी ६४०० मतांनी जिंकली होती पण तेथील विजयी उमेदवार नंतर काँग्रेसला मिळाल्याने तेथे उमेदवार उभा करण्याइतकासुद्धा कम्युनिस्टांचा प्रभाव राहिला नाही. मार्क्सवादी मराठवाड्यात यावेळी फक्त बिल्लोळीची जागा लढवीत आहेत. पण तेथेही निवडून येण्याइतके त्यांचे बळ नाही.

विदर्भात सात जागा कम्युनिस्ट पक्ष लढवीत आहे. गेल्या वेळी या भागात एकही जागा त्यांना मिळाली नव्हती व गेल्या चार वर्षांत या जागा जिंकण्याइतका त्यांचा प्रभाव वाढलेला नाही. मार्क्सवाद्यांनी फक्त वर्ध्याची जागा १९६७ मध्ये जिंकली होती, पण यावेळी ती न लढविता नागपूर मध्य व मोडशी या जागा ते लढवीत आहेत, पण तेथे काँग्रेसचाच जोर अधिक आहे.

दोन्ही कम्युनिस्ट पक्षांच्या दृष्टीने सबंध महाराष्ट्राचा विचार करता कम्युनिस्टांना राहुरीशिवाय इतर जागा जिंकणे कठीण जाणार आहे. मार्क्सवाद्यांनी एक जागा गेल्या वेळी जिंकली. यावेळी तेवढी तरी मिळेल की नाही याची शंका आहे.

विरोधी पक्षांमध्ये सर्वांत जास्त जागा जनसंघ लढवीत आहे. गेल्यावेळी जनसंघाने फक्त चार जागा जिंकल्या होत्या. यावेळीही त्यात फारशी भर पडेल असे वाटत नाही. पुण्यातील शुक्रवार पेठची जागा जनसंघाच्या दृष्टीने प्रतिष्ठेची आहे. १९६७ साली म्हाळगींनी १७ हजारांवर मतांनी ती जिंकली. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीतही त्यांनी आघाडी टिकविली. पण ती ९००० पर्यंत खाली आली. त्यामुळे आपणही जागा जिंकू असा जनसंघाला विश्वास वाटत आहे पण गेल्या वेळेइतके काँग्रेस बद्दल असंतोषाचे वातावरण आता राहिलेले नाही हे लक्षात घेता म्हाळगींना ही जागा जिंकणे सोपे जाणार नाही.

काँग्रेस रिपब्लिकन युति मोडली. काँग्रसच्या यशावर त्याचा परिणाम होईल असा प्रयत्न रिपब्लिकन नेते करीत असले तरी प्रत्यक्षात तशी शक्यता दिसत नाही महाराष्ट्रात गायकवाड गटाचा फारसा प्रभाव नाही. काँग्रेसच्या पाठिंब्याने दोन चार जागा मिळविण्या पुरताच या युतीचा त्याला उपयोग होता. पक्षाच्या दोन्ही गटांमध्ये खोब्रागडे गटाचा प्रभाव अधिक आहे. पण अनेक ठिकाणी या दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले आहेत हे लक्षात घेता, रिपब्लिकन पक्ष फारशा जागा मिळवील असे वाटत नाही.

इतरविरोधी पक्षांमध्ये शिवसेनेचा प्रभाव मुंबईच्या काही भागात आहे. संघटना काँग्रेसचेही बळ मुंबई व विदर्भाच्या काही भागात आहे पण लोकसभा निवडणुकीचे मतदान लक्षात घेता या दोन्ही पक्षांना यश मिळण्याची शक्यता फार थोडी आहे. स्वतंत्र पक्ष महाराष्ट्रात नावापुरता असून नावापुरत्या तीन जागा तो लढवीत आहे गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत विधान सभेच्या फक्त वीस मतदार संघात विरोधी उमेदवारांना काँग्रेसपेक्षा अधिक मते मिळाली होती हे लक्षात घेता विरोधी पक्षांना पंचवीस तीसपेक्षा अधिक जागा मिळण्याची शक्यता फार कमी आहे.

काँग्रेसविरुद्ध उभ्या राहिलेल्या बंडखोरांचा बराच गाजावाजा वृत्तपत्रांतून केला जात आहे. पण या बंडखोरीमुळे दोनचार जागा गमावण्यापलीकडे काँग्रेसच्या यशावर फारसा परिणाम होईल असे वाटत नाही. एकूण परिस्थितीचा विचार करता लोकसभा निवडणुकी सारखेच भरघोस यश काँग्रेस महाराष्ट्रात मिळवील असा रंग दिसत आहे. सधन शेतकरी हाच काँग्रेसच्या यशाचा अजूनही मुख्य आधार आहे.

## एक अनिष्ट प्रवृत्ती

निकोप लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने एका अनिष्ट प्रवृत्तीकडे लक्षवेधने आवश्यक वाटते. बंडखोर काँग्रेस उमेदवारांसाठी विरोधी पक्षांनी काही ठिकाणी आपले उमेदवार मागे घेतले आहेत. काँग्रेसने तिकिट नाकारल्याने जे काँग्रेस विरुद्ध उभे राहिले त्यांना पाठिंबा देताना व त्यांच्यासाठी आपले उमेदवार मागे घेताना कोणती तत्त्वनिष्ठा विरोधी पक्षांनी पाहिली ? हे संधिसाधू काही दिवसांनी पुन: काँग्रेसमध्ये जातील व त्यांना घेतलेही जाईल. सधिसाधू पक्षांतरास परिणामकारक आळा बसायला हवा असेल तर अशा संधीसाधूंना खड्यांप्रमाणे दूर ठेवले पाहिजे. कोणत्याच पक्षाने त्यांना पाठिंबा देता कामा नये किंवा जवळ करता कामा नये. हे तत्त्वज्ञान आग्रहाने पाळण्याची आवश्यकता सत्तारूढ पक्षालाही वाटत नाही आणि विरोधी पक्षांनाही वाटत नाही. कारण सारे सत्तेच्या व निवडणुका जिंकण्याच्या मागे लागले आहेत. अशा पद्धतीने कितीही निवडणुका लढविल्या तरी त्यातून प्रभावी तत्त्वनिष्ठ, विरोधी पक्ष उभा राहण्याची शक्यता दिसत नाही. निकोप लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने ही परिस्थिती निराशाजनक आहे.

## पश्चिम बंगाल : निर्णायक बहुमत काँग्रेसला कठीण

पश्चिम बंगाल व बिहार ही सर्वांत अस्थिर राज्ये. या निवडणुकीनंतर तरी तेथे स्थिर सरकारे अधिकारावर येतील काय हा या निवडणुकीतील महत्त्वाचा प्रश्न असून त्याचा निर्णायक कौल मतदारांनीच द्यावयाचा आहे.

पश्चिम बंगालमध्ये १९६७ नंतर तिसऱ्यांदा निवडणूक होत आहे. निर्णायक बहुमतासाठी काँग्रेस व कम्युनिस्ट यांची आघाडी आणि मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखालील सात पक्षांची आघाडी यांच्यातच मुख्यतः लढत आहे. काँग्रेसने कम्युनिस्टांशी युती केली, याचा उघड अर्थ एकट्याच्या बळावर निर्णायक बहुमत मिळविण्याची खात्री काँग्रेसला वाटत नाही. पण ही युती तरी निर्णायक बहुमत मिळवू शकेल काय ? दोन्ही पक्ष मिळून विधानसभेच्या सर्व–२८०–जागा लढवीत आहेत. त्यात कम्युनिस्टांसाठी ४१ जागा काँग्रेसने मोकळ्या सोडल्या आहत. गेल्या तीन निवडणुकांत या पक्षांच्या बळात काय फरक पडला याचा विचार करूनच येत्या निवडणुकीतील त्यांच्या यशाबद्दल अंदाज बांधता येईल.

काँग्रेसने १९६७ साली १२७, १९६९ मध्ये ५५ व १९७१ मध्ये १०५ जागा जिंकल्या. काँग्रेसला १९६९ मधील घसरगुंडी सावरण्यात १९७१ मध्ये बरेच यश आले. पन्नास जागा काँग्रेसने अधिक मिळविल्या हे खरे. तरीही १९६७ चे स्थान गाठण्याला २२ जागा कमी पडल्या आणि निर्णायक बहुमत मिळविण्यासाठी ३६ जागा कमी पडल्या. मतांच्या दृष्टीने विचार केला, तर काँग्रेसला १९६७ मध्ये ४१.१ टक्के, १९६९ मध्ये ४१.२ टक्के व १९७१ मध्ये फक्त २८.२० टक्के मते मिळाली. स्वातंत्र्यानंतरच्या सर्व निवडणुकांत मतांच्या दृष्टीने काँग्रेसची ही सर्वांत जास्त घसरगुंडी होती. काँग्रेसमधील फूट हे या घसरगुंडीचे एक कारण. संघटना काँग्रेसला ५.५८ टक्के मते मिळाली. दोन्ही काँग्रेस पक्षांची एकत्रित मते ३३.७८ टक्के आहेत. म्हणजे १९६९ पेक्षा ती ८ टक्क्यांनी कमी आहेत. जागा किती मिळाल्या यापेक्षा मते किती मिळाली हेच लोकमताच्या पाठिंब्याचे खरे निदर्शक मानले पाहिजे. या दृष्टीने पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसचे वजन वाढले नसून घटले आहे. असाच निष्कर्ष शेकडा मतदानाच्या आकड्यांवरून निघतो. निर्णायक बहुमत मिळविण्याच्या दृष्टीने ही परिस्थिती फारशी आशादायक नाही.

कम्युनिस्टपक्षाने १९६७ मध्ये ४३, १९६९ मध्ये ३० व १९७१ मध्ये अवघ्या १३ जागा मिळविल्या. कम्युनिस्टपक्षाची ही वाढती घसरगुंडी त्याच्या घसरलेल्या वजनाचीच निदर्शक आहे. मतांच्या दृष्टीने कम्युनिस्टांना १९६७ मध्ये ८.०५ टक्के, १९६९ मध्ये ७ टक्के व १९७१ मध्ये ८.१३ टक्के मते मिळाली. याचा अर्थ मतांच्या दृष्टीने पक्षाचे बळ घटलेले नाही. गेल्या वर्षीच्या निवडणुकीत १९६७ एवढीच मते कम्युनिस्टांना मिळाली. १९६९ मध्ये मतांच्या प्रमाणात थोडी घट झाली होती. पण ती यावेळी त्यांनी भरून काढली. काँग्रेस व कम्युनिस्टांना मिळून

१९७१ मध्ये ११८ जागा मिळाल्या दोन्ही पक्षांच्या युतीने आणखी किती जागा तें जास्त मिळवू शकतील ? निर्णायक बहुमतासाठी त्यांना आणखी २३ जागा मिळवायला हव्यात. त्या मिळविणे सोपे नाही. कारण गेल्या वर्षीच्या निवडणुकीत अनेक मतदारसंघात काँग्रेसचा पाठिंबा मिळूनसुद्धा कम्युनिस्ट तेरापेक्षा अधिक जागा मिळवू शकले नाहीत.

मार्क्सवादी आघाडीला तरी निर्णायक बहुमत मिळण्याची कितपत शक्यता आहे ? या आघाडीस १९६७ मध्ये ६२ व १९७१ मध्ये १२३ जागा मिळाल्या. १९६९ मध्ये चौदा पक्षांची एकच संयुक्त आघाडी होती. त्यात उजव्या कम्युनिस्टांच्या बाजूचे पक्ष व मार्क्सवाद्यांचे बाजूचे पक्ष दोन्ही सामील होते. या आघाडीने एकूण २८० जागांपैकी २१४ जागा मिळविल्या होत्या. पण ते केवळ मार्क्सवादी आघाडीचे बळ नव्हते, काँग्रेसविरुद्ध एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रथमच स्थापन झालेल्या संयुक्त आघाडीने मिळविलेला तो संघटित विजय होता. ही संयुक्त आघाडी फुटताच मार्क्सवादी आघाडीचे वास्तविक बळ १९७१ च्या निवडणुकीने दाखवून दिले. यावेळी एकटे कम्युनिस्ट सोडून बाकी सर्व छोट्या डाव्या पक्षांना आपल्या आघाडीत आणण्यात मार्क्सवाद्यांनी यश मिळविले आहे. या छोट्या पक्षांचे समाधान करण्यासाठी मार्क्सवाद्यांनी त्यांच्यासाठी ७७ जागा सोडल्या आहेत, बाकीच्या २०३ जागा मार्क्सवादी लढवीत आहेत. मार्क्सवादी आघाडीत सध्या जे सात पक्ष आहेत त्या सर्वांनी मिळून १९७१ च्या निवडणुकीत १३३ जागा मिळविल्या होत्या. पण यातले काही पक्ष त्यावेळी त्यांच्या आघाडीत नव्हते. आता आघाडीत सामील झाल्याने थोड्या अधिक जागा त्यांना मिळतील व आपण बहुमत मिळवू असा विश्वास मार्क्सवाद्यांना वाटत आहे. तीन निवडणुकात मार्क्सवाद्यांचे बळ ४३, ८०, १११ असे वाढत गेले आहे.

या वेळच्या निवडणुकीचा एक विशेष म्हणजे ९५ मतदारसंघात सरळ सामने होणार आहेत. गेल्या वेळी फक्त ४ मतदारसंघात सरळ लढती झाल्या होत्या. सरळ सामन्यात कोण अधिक जागा जिंकतो यावरच पश्चिम बंगालची सत्ता यावेळी कोणाकडे जाणार हे ठरणार आहे. पण मार्क्सवादी आघाडीस बहुमत मिळाले तरी ते अल्प बहुमत असेल. आघाड्यांचा पूर्वीचा अनुभव लक्षात घेता त्यातून स्थिर राजवट येण्याची शक्यता थोडी आहे.

या दोन मुख्य आघाड्यांशिवाय संघटना काँग्रेस, मुस्लीम लीग, झारखंड पक्ष वगैरे इतर पक्ष निवडणुका लढवीत आहेत. पण निवडणुकीवर निर्णायक प्रभाव पाडण्याइतके त्यापैकी कोणाचेच बळ नाही.

## बिहार : अस्थिरतेची कायम डोकेदुखी

बिहारमधील अस्थिरता या निवडणुकीनंतसुद्धा दूर होण्याचा संभव बराच कमी आहे. काँग्रेसने कम्युनिस्ट व प्रजासमाजवाद्यांशी युती केली असून त्यांच्या मदतीने

निर्णायक बहुमत मिळविण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. कम्युनिस्टांशी युती केली असली तरी आठ मतदारसंघात दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेस २५८ जागा लढवीत असून कम्युनिस्टांसाठी ४९ व प्रजासमाजवाद्यांसाठी ११ जागा सोडल्या आहेत. कम्युनिस्टांसाठी एवढ्या जागा काँग्रेसने सोडाव्या ही युतीची जबर किंमत असून अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांत त्याबद्दल नाराजी आहे पण पक्षातील या असंतोषापेक्षा काँग्रेस राजवटींबद्दल सर्वसामान्य जनतेत असलेला असंतोष काँग्रेसला अधिक नडणार आहे. काँग्रेसमधील फुटीनंतर दरोगाप्रसाद राय यांच्या नेतृत्वाखाली एक व पाशवान शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली दुसरे अशी काँग्रेस नेतृत्वाखालील आघाडीची दोन सरकारे आली पण पूर्वीच्या सरकारांपेक्षा चांगला कारभार ही सरकारे करून दाखवू शकली नाहीत. गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने बिहारमध्ये चांगले यश मिळविले हे खरे. पण त्यावरून विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस असेच मोठे यश मिळवील असा अंदाज बांधता येणार नाही. कारण बिहारमधील निवडणुकांत काँग्रेसला विधानसभेच्या मानाने लोकसभा निवडणुकीत नेहमीच चांगले यश मिळत गेलेले आहे. विधानसभेच्या पाच निवडणुकांत बिहारमध्ये काँग्रेसचे पक्षबळ १९५२ मध्ये २४०, १९५७ मध्ये २२०, १९६२ मध्ये १९५, १९६७ मध्ये १२८ व १९६९ मध्ये ११८ याप्रमाणे घटत गेले. इंदिरागांधींच्या व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने बिहारमध्ये मोठे यश मिळविले पण त्याचा फायदा विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळण्याचा संभव फार कमी आहे.

काँग्रेसशिवाय समाजवादी पक्ष, जनसंघ, संघटना काँग्रेस हे पक्षही मोठ्या प्रमाणावर जागा लढवीत आहेत. पण निर्णायक बहुमत मिळविण्याइतकी ताकद त्यांपैकी कोणत्याच पक्षाची नाही. ही परिस्थिती विचारात घेता अस्थिर बिहारची डोकेदुखी या निवडणुकीनंतरही राहणारच असा रंग दिसत आहे.

□ □ □

असावेत. काय द्यायचे आणि काय नाही; द्यायचे ते कसे याविषयी त्यांना काहीच प्रशिक्षण मिळाले नसावे. एका मतदार संघाची त्यात आलेली माहितीच पुढे देत आहे. म्हणजे तेथील पत्रकारांचा मागासलेपणा वाचकांच्या लक्षात येईल.

## भानगडगल्ली मतदारसंघ

या मतदार संघात अनेकरंगी लढत आहे. सर्व पक्षाचे प्रतिनिधी, सर्व पक्षाचे बंडखोर आणि दोन अपक्ष इथे निवडणुकीसाठी उभे आहेत. सत्ताधारी राष्ट्रपक्षाविरुद्ध एकमेव विरोधी उमेदवार उभे करण्याचे सुरुवातीला ठरले होते. पण आपसातील लाथाळीमुळे ते जमले नाही. या मतदार संघात आतापर्यंत निवडणूक प्रचारात फक्त दोन खून झाले आहेत. दिवसातून तीन-चार मारामाऱ्या होतात.

## सत्ताधारी राष्ट्रपक्षाचे सोमाजी धोंडीबा दगडे

श्री. दगडे आतापर्यंत तीनदा याच मतदार संघातून निवडून आले असून यंदा निवडून आल्यास यावेळी त्यांना नक्कीच मंत्रिपदाचा चान्स असल्याची अफवा आहे. त्यांचे वय ७८ असले, तरी निवडून येण्याचा उत्साह तरुणांनाही लाजवितो. पक्षाघाताने त्यांचे अंग थरथरत असले आणि कुणाच्या आधाराशिवाय त्यांना चालता येत नसले तरी ते खुर्चीत बसून प्रचार सभांमध्ये तीन-तीन तास भाषणे देतात. मागील विधानसभेत त्यांनी पंचेचाळीस वेळा होऽऽय आणि एकतीस वेळा आऽऽऽय असे मोठ्याने आवाज केल्याचे रेकॉर्ड असून एकदा तर चक्क उभे राहून "मी या ठरावाला अनुमोदन देतो" असे स्पष्ट उद्गार काढले आहेत. पहिल्यांदा निवडून आले त्यावेळी त्यांनी विधानसभेतील तीन मारामाऱ्यांमध्ये भाग घेतला होता. आणि एका मारामारीत तर त्यांनी एका विरोधी आमदाराचे टाळके फोडले होते.

श्री. दगडे अत्यंत दरिद्री अवस्थेतून वर आले. राजकारणात त्यांनी प्रवेश केला तेव्हा त्यांना खायचीही मारामार होती. आता त्यांची तीन वेगवेगळ्या ठिकाणी प्रचंड शेते आहेत. शहरात चार पेट्रोल पंपात, दोन सिनेमा थेटरांमध्ये आणि एका वड्या हॉटेलमध्ये भागीदारी आहे. तीन ठिकाणी एअर-कंडिशन्ड फ्लॅट्स् असून एक भव्य बंगलाही आहे. तीन मोटारी आहेत त्यातली एक इंपोर्टेड. यावरून त्यांच्या विलक्षण कर्तृत्वाची साक्ष पटावी.

त्यांचे स्वत:चे शिक्षण जरी तिसऱ्या इयत्ते पुढे झाले नसले, तरी त्यांना शिक्षणाची फार आस्था आहे. त्यांचे एक चिरंजीव अमेरिकेत व एक फ्रान्समध्ये शिकत असून

आठ-दहा शिक्षणसंस्थांचे ते अध्यक्ष आहेत. तीन सहकारी साखर कारखान्यांशी त्यांचा घनिष्ट संबंध असून अनेक सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळींशी त्यांचा सतत संपर्क असतो.

श्री. दगडे सौंदर्य रसिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे तिसरे लग्न नुकतेच एका २३ वर्षे वयाच्या सौंदर्यवतीशी झाले असून सुंदर सुंदर मुली त्यांच्या दृष्टीतून कधी सुटत नाहीत. त्यांच्या बंगल्यांची आणि फ्लॅट्सची अद्ययावत गृहसजावट त्यांच्या सौंदर्यदृष्टीची साक्ष देते. श्री. दगडे सर्वोदयवादी असले तरी फक्त उंची मद्याचे शौकीन होते. आता वैद्यकीय सल्ल्यामुळे त्यांना मद्य वर्ज्य आहे.

श्री. दगडे यांची पक्षाच्या क्रांतिकारी समाजवादी धोरणावर अढळ निष्ठा आहे. पक्षाच्या नेतृत्वाचे हात बळकट करण्याची त्यांची जिद्द आहे. गोरगरिबांचे पाठीराखे, दलितांचे कैवारी म्हणून ते प्रसिद्ध आहेत. आपल्या चिमुकल्या देशात समाजवाद आल्याशिवाय देश सुधारणार नाही अशी त्यांची पक्की श्रद्धा आहे. समृद्धीच्या विकेंद्रीकरणावरही त्यांचा विश्वास असून निवडणुकीच्या निमित्ताने ते बरेच पैसे वाटणार असल्याची बोलवा आहे.

## भीमजीभाई करणदास मेथा (जुना राष्ट्रवादी पक्ष)

राष्ट्रवादी पक्षाच्या स्थापनेपासून भीमजीभाई पक्षात आहेत. त्यावरून त्यांच्या वयाची कल्पना यावी. कुणी म्हणतात ते ९७ वर्षांचे आहेत. तर कुणी त्यांनी शंभरी केव्हाच ओलांडल्याचे सांगतात. राष्ट्रवादी पक्षाची शकले होईपर्यंत ते पंचवीस वर्षे मंत्री होते. स्वतः कट्टर सोवळे असले तरी त्यांच्या एका चिरंजिवांचा उत्तर प्रदेशात मद्याचा कारखाना आहे. दुसऱ्या चिरंजिवांचा मोटार कारखाना असून जावई इंपोर्ट एक्स्पोर्टमध्ये बडे प्रस्थ आहेत. त्यांची नातवंडे पणतवंडेदेखील अशीच बड्या धंद्यांमध्ये आहेत.

नव्या राष्ट्रवादी पक्षाच्या हुकूमशाही धोरणाचा त्यांना तिटकारा असून लोकशाही, समाजवाद व गरिबांचे कल्याण यासाठी आपलाच पक्ष योग्य असल्याचे ते सांगतात. पूर्वीच्या काळी निवडणुकीच्या वेळी त्यांच्या कचेरीला युद्ध छावणीचे स्वरूप यायचे. आता कचेरीत एक-दोन कार्यकर्त्यांशिवाय कुणी येत नसले तरी आपणच निवडणूक जिंकू असा आत्मविश्वास त्यांना आहे. सध्या ते वार्धक्याने रुग्णशय्येवर खिळून असल्याने प्रचारासाठी त्यांना बाहेर पडता येत नसले तरी त्यांचे पगारी प्रचारक दारोदार हिंडताहेत.

मूळचे ते गर्भश्रीमंत. त्यामुळे त्यांचे कर्तृत्व चटकन नजरेत भरत नाही. पण मंत्रीपदावर येण्यापूर्वी ते केवळ तेरा कंपन्यांमध्ये भागीदार होते आणि नऊ कंपन्यांचे संचालक होते. त्यांनी मंत्रीपद सोडले तेव्हा अठ्ठेचाळीस कंपन्यांमध्ये त्यांची भागीदारी होती, एक्कावन कंपन्यांमध्ये डायरेक्टर होते. त्यांच्या मालकीच्या

कंपन्यांचे भांडवल अडीच कोटी रुपयांवरून सव्वादोनशे कोटी रुपयांपर्यंत पोचले होते. यावरून त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटावी. बंगले किती, फ्लॅट्स् किती, मोटारी किती या किरकोळ गोष्टी.

भीमजीभाईंनी आतापर्यंत पाच लग्ने केली. त्यांच्या पाचव्या सहधर्मचारिणी या त्यांच्या मूळच्या सेक्रेटरी. वय वर्षे सत्तावीस. सुविद्य, सुस्वरूप व सुस्वभावी. निवडणूक प्रचारात त्या हिरीरीने भाग घेतात.

## अनंत रामचंद्र कोटिबुद्धचे (भानगडद्वीप साम्यवादी पक्ष)

पक्षाच्या स्थापनेपासूनचे निष्ठावंत कार्यकर्ते. सतरावेळा रशियात जाऊन आले असून तीन वेळा रशियातच त्यांच्या डोक्याचे ऑपरेशन झाले आहे. सुरुवातीला ते राष्ट्रवादी पक्षात होते. पण साम्यवादी पक्षाची स्थापना झाल्यावर तिकडे गेले. भानगडद्वीपात चोवीस संप त्यांनी संघटित केले. एकोणीस संप फसले. सतरा संपात लाठीमार खाल्ला आणि एकवीस वेळा तुरुंगवास भोगला.

भानगडगल्लीतील राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार व कार्यकर्ते अद्याप साम्राज्यवाद्यांच्या पंजाखाली असल्याने इथे त्यांना विरोध करणे आवश्यक आहे असे कोटीबुद्धचे यांना वाटते. एरवी त्यांच्या पक्षाचे धोरण राष्ट्रवादी पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे हात बळकट करण्याचे आहे.

सतत रशियाला जात असल्यामुळे त्यांचे राहणीमान खूप सुधारले असल्याने त्यांच्यावर बाकीच्या पक्षातले लोक टीका करतात. पण प्रकृतीमुळे राहणीमान चांगले ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांना वाटते. शिवाय त्यामुळे साम्यवादावरची निष्ठा काही ढळत नाही. द्वीपात साम्यवादी सरकार येणार नसल्याची त्यांना खात्री असल्याने डाव्या शक्ती बळकट करण्याचे आपले धोरण असल्याचे ते सांगतात. त्यांच्या पक्षात भानगडगल्लीत त्यांची पत्नी, तीन मुले, दोन मुली व दोन जावई मिळून एकूण अकरा कार्यकर्ते आहेत. शिवाय काही बेकार कामगार आहेत.

## सदाशिव विष्णू भिडे (द्वीप-संघ)

द्वीपसंघाच्या कार्याला आजन्म वाहून घेतलेले तेजस्वी ब्रह्मचारी कार्यकर्ते. अपार उत्साही. रोज सकाळ संध्याकाळ निष्ठावानपणे भानगडगल्लीतील मुलांना लाठीकाठीचे शिक्षण देतात. मुले आली नाहीत म्हणजे स्वतःच लाठी फिरवीत राहतात. नाहीतर दंडबैठका काढतात. पक्षाचे एक दक्ष आणि शिस्तबद्ध सैनिक. पक्षाने त्यांच्या आज्ञेबाहेर एक कणही जाण्याची प्रज्ञा नाही. द्वीपाला एक तेजस्वी व राष्ट्रीय सरकार देण्याचे व्रत यांच्या पक्षाने घेतले आहे. निदान पुढली पिढी तरी हे कार्य पार पाडू शकेल अशी अंधुक आशा यांना आहे. पण कार्य चालूच आहे. वय वर्षे अडोतीस.

**दत्तात्रय बबन पवार** (द्वीप समाजवादी पक्ष)

भानगडगल्लीतील समाजवादी पक्षाचे एकमेव सभासद आणि नेते. दुसरा सभासद म्हणजे यांची पत्नीच. धडाडीचे नेते म्हणून द्वीपभर प्रसिद्ध. द्वीपात यांच्या पक्षाचे असे सुमारे ११३ धडाडीचे नेते आहेत. त्यांपैकी १९ ब्रह्मचारी असल्याने पक्षाची सभासद संख्या ९४ होती ती द्रुतगतीने वाढत आहे. यांच्या सभेला लाऊड-स्पीकर नसतो. पूर्वी भानगडगल्लीतील बरेच कामगार यांचे अनुयायी होते. पण आता सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षानेच समाजवादाची घोषणा दिल्याने ते निघून गेले.

पूर्वी नेत्यांची संख्याही चार-पाचशेवर होती. हळूहळू बरेच नेते राष्ट्रवादी पक्षात गेले असून त्यांपैकी काही मंत्री बनले व काहींनी राजकारणसंन्यास घेतला.

(या नंतर प्रत्येक पक्षाचे तिकीट मिळाले नाही म्हणून उभे असलेल्या बंडखोरांची माहिती)

**मंगळ्या धन्नू शेट्टी** (अपक्ष)

हातभट्टीचा धंदा असल्याने यांना सरकारचे दारूबंदीचे धोरण नापसंत आहे. म्हणून हे निवडणुकीस उभे आहेत. भानगडगल्लीतील झोपडपट्टी यांच्याच मालकीची असून आजूबाजूच्या दोन पोलीस स्टेशन्सच्या हद्दीत यांचा दरारा आहे. पूर्वी एका खुनाबद्दल दुसऱ्या गल्लीतून हद्दपार झाल्याने इकडे आले. आता त्यांना हात लावण्याची कुणाची ताकद नाही. मटक्याचे ते प्रमुख दादा असून स्मगलिंगशी यांचा संबंध असल्याने वरपर्यंत त्यांचे लागेबांधे असल्याचे सांगतात. विरोधी पक्षाची मते फोडण्यासाठी सत्ताधारी पक्षानेच त्यांना उभे केल्याची अफवा.

**बेनेगल जयंत इरसाल** (अपक्ष)

दर निवडणुकीस हे उभे राहतात. अर्ज भरतात. आणि पुरेसे पैसे मिळाले, की निवृत्त होतात. त्यावर त्यांची पाच वर्षे बरी गुजराण चालते. यंदा आणखी पाच नवे अपक्ष उभे राहिल्याने यांना निवृत्त करण्यास कुणाला सवड मिळाली नाही. त्यामुळे नाईलाजाने उभे आहेत. डिपॉझिटचे पैसे गेले म्हणून हळहळताहेत.

**वा. वि. ढेकणे** (अपक्ष)

तत्त्व म्हणून दर निवडणुकीस उभे राहतात. आणि डिपॉझिट हरतात. वर्गणी करून डिपॉझिटचे पैसे जमवतात. मरेपर्यंत निवडणुका लढविण्याची प्रतिज्ञा. पेशा कारकुनी, पत्नी शिक्षिका. घरी खाण्याचे हाल.

◻ ◻ ◻

निर्मला मोने


या वर्षी संगीत नाट्य अकादमीचं उत्तम दिग्दर्शनाचं पारितोषिक सत्यदेव दुबे यांना देण्यात आलं.

नाट्यशौकिनांना दुबे याचं नाव तसं आज अनेक वर्षं चांगलं परिचित आहे. किंबहुना ' थिएटरयुनिट ' म्हणजे सत्यदेव दुबे हे समीकरण या वर्तुळात सर्वमान्य होऊन बसलेलं आहे. पण दुबे म्हणजे फक्त थिएटरयुनिट मात्र नव्हे. दुबे म्हणजे एक वादळ आहे. झपाटणारं, झपाटलेलं, मनस्वी. दुबे नक्की कसा आहे ? कोण जाणे ? बाकीच्यांचं राहू द्या पण त्याचं त्यालाही ते धडपणी कळत नसावं तापट दिग्दर्शक, मेहनती नट, नवीन भाषा उत्साहानं शिकणारा अभ्यासू विद्यार्थी, चिकित्सक टीकाकार, स्वप्नवेडा निर्माता, आश्वासक मित्र, आणि समाजाच्या अभिरुचीला वळण लावू इच्छिणारा एक महत्त्वाकांक्षी लोकसेवकही. दुबे हे सगळं काही आहे आणि तरी किंवा खरं तर त्यामुळेच एकाला जाणवलेला दुबे दुसऱ्याच्या प्रत्ययाला येत नाही, समजलासा वाटला तरी उमजत नाही. याचा अपरिहार्य परिपाक एकच. साऱ्यात असून, दुबे पुन्हा वेगळाच राहातो; दूरस्थ, एकाकी, अस्वस्थ.

आयुष्याची वाटचाल निश्चित करताना आपलं नेमकं साध्य काय याची डोळस जाणीव असणारे जगात थोडेच. दुबे या बाबतीत भाग्यवान आहे. नाटक त्याच्या धमन्यांतून वहातंय. दुबे नाटकासाठी आहे, नाटक दुबेसाठी. अर्थात् असे नाटकवेडे

# सत्यदेव दुबे

झपाटणारं
झपाटलेलं
मनस्वी
वादळ



लोक आपल्याला नवीन नसतात. महाराष्ट्रात तर हे खूळ बदनाम करण्याइतके प्रसिद्ध. पण असे लोकही नाटकाच्या कोणत्यातरी विशिष्ट अंगापुरतंच आपलं वेड मर्यादित करतात, स्वतःला वाहून घेतात, दुबे तेवढ्यावर थांबत नाही. तसं थांबणं त्याला शक्यच नाही. दुबे म्हणजे सर्वांगांनी नाटक. निर्मिती, दिग्दर्शन, अभिनय नेपथ्य, प्रकाशयोजना, लेखन, नाटकाचा इतिहासभूगोल, शास्त्र, संस्कृती आणि भविष्यही. दुबे नाटकाला अक्षरशः पुरून उरला आहे. नाट्यविषयाचा संपूर्ण अभ्यास करवून घेणाऱ्या ज्या दोनतीनच संस्था (स्कूल्स) भारतात उपलब्ध आहेत; त्यात दिल्लीच्या अल्काझींच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'साठी एक बोट मोडावं लागतं, दुसरी संस्था सत्यदेव दुबे. थिएटरयुनिट हे तिचं रीतसर नाव. थिएटरयुनिटही तसं अल्काझींचंच. काही कारणांनी मुंबईतली ही संस्था सोडून अल्काझी दिल्लीला स्थायिक झाले आणि तिथं त्यांनी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चा प्रपंच मांडला. अल्काझींकडे उमेदवारी करणाऱ्या दुबेनं तेव्हा थिएटरयुनिट आपल्या ताब्यात घेतलं आणि पहातापहाता तिचा संपूर्ण कायापालट करून टाकला. सुरुवातीला थिएटरयुनिट तर्फे फक्त इंग्रजी नाटकांचेच प्रयोग होत. दुबेनं त्या संस्थेचं भारतीयीकरण करण्याचं मनावर घेतलं. थिएटरयुनिट हिंदीतूनही नाटकं सादर करू लागलं. अनेक गाजलेल्या दर्जेदार, किंवा प्रायोगिक पण समृद्ध पाश्चात्य नाटकांचे अनुवाद हिंदीतून त्यानं लोकांपुढे ठेवले. सर्त्र, कामू, ब्रेख्ट ही नावं लोकांच्या जिभेवर फॅशन म्हणून खेळत होतीच, पण ही माणसं जे लिहितात ते समजेल अशा भाषेत लोकांपुढं आणलं गेलं. या नाटकाबरोबरच अभिजात आणि कसदार अभिनेत्या-अभिनेत्रींचीही देणगी रंगभूमीला दिली. कामेरकर भगिनी (ज्योत्स्ना कार्येकर, सुलभा देशपांडे, आशा दंडवते आणि कुमुद पोवार) अमोल आणि अनुया पालेकर, अमरीश पुरी, सुनील प्रधान, भक्ती बर्वे, अलकनंदा समर्थ ही मंडळी रंगमंचावर यापूर्वीही वावरत होती, पण त्यांच्या अभिनयगुणांचा कस लावला गेला तो थिएटरयुनिटमुळेच. या कलावंतांनी मराठीइतकीच हिंदी रंगभूमीही गाजवली, त्याचे त्या खुद्द कलावंतापेक्षाही अधिक श्रेय दुबेलाच आहे.

पण दुबेचं कर्तृत्व याहीपेक्षा मोठं आहे. प्रांतिक नाटकांना एकत्र येण्यासाठी थिएटरयुनिटच्या रूपानं एक मोठं व्यासपीठ त्यानं उपलब्ध करून दिलं आहे. केवळ इंग्रजी नाटकंच रंगमंचावर आणण्याची थिएटरयुनिटची जुनी प्रथा त्यानं मोडली. पण अनेक पाश्चात्य नाटकं हिंदीत अनुवादित करून मूळ स्वरूपात भारतीय प्रेक्षकांपुढे त्यानं उभी केली. आणि नंतर त्याहीपुढे जाऊन प्रांताप्रांतातली गाजलेली नाटकं त्यानं हिंदी मराठीत रंगमंचावर आणली. बादल सरकार, गिरीश कर्नाड, राजेंद्र यादव, आद्य रंगाचार्य, मोहन राकेश, राजेंद्रसिंह बेदी, विजय तेंडुलकर, चिं. त्र्यं. खानोलकर यांची नावं इतर प्रांतियांना नाटककार म्हणून माहिती झाली. प्रायोगिक नाटकं महोत्सव साजरे करू लागली. प्रांताप्रांताच्या

आणि भारताच्या राजधानीत हजेरी लावू लागली. मानमरातब घेऊन परंतू लागली. किंबहुना अखिल भारतीय पातळीवर पारितोषिकासाठी साऱ्या प्रांतीय भाषातील नाटकांचा नव्यानं विचार होऊ लागला. या श्रेयापैकी सिंहाचा वाटा सत्यदेव दुबे याचा आहे. दुबेनं ही नाटकं रंगमंचावर आणली. कोणतीही, कसलीही तडजोड न स्वीकारता, केवळ कलामूल्यांचाच विचार करून जिद्दीनं सादर केली. नव्या कलाकारांचे सुप्त गुण हेरले. प्रेक्षक खेचण्यासाठी मोहक चेहरा, सौष्ठव-पूर्ण अंगलट, अगर सिनेसृष्टीतील नावाचा दबदबा यांचा नाटकाच्या जाहिरातीसाठी वापर केला नाही. तेजपाल ऑडिटोरियमसारख्या आडजागी आपल्या नाटकांचे सतत प्रयोग लावले. रिकाम्याखुर्च्यांपुढे कराव्या लागणाऱ्या प्रयोगांनी तो खचला नाही. सर्वांगांनी नाटकाचा दर्जा कायम राखण्याचा हट्टही सोडला नाही. या तप-श्चर्येला फळ मिळालंच. सुबुद्ध प्रेक्षकांना रंगभूमीला वेगळं वळण लावणारी ही नाटकं पहाण्यासाठी तेजपालला गर्दी करण्याची सवय लावून घ्यावी लागली, 'गिधाडे' 'अवध्य' यांसारखी वादग्रस्तच नव्हेत तर 'पगला घोडा' 'आधे अधुरे' यांसारखी, वेगळंच जग आणि जाचक वास्तवता साकार करणारी नाटकंही 'हाऊसफुल्ल' होऊ लागली. नाट्यक्षेत्रात दुबेचं नाव आज मानानं, आदरानं आणि दबदब्यानं घेतलं जाऊ लागलं आहे.

दुबेला बक्षीस आज मिळालंय. पण तो पहिल्यापासूनच असा आहे. त्याच्या कर्तृत्वाविषयीचा त्याचा आत्मविश्वासही असाच विशेष. पाचसहा वर्षांपूर्वी त्यानं काढलेल्या एका लघुपटानं चित्रपटसृष्टीत खळबळ उडवून दिली होती. नाटक तर त्याचं सर्वस्व. दुबे रात्रंदिवस नाटकच जगतो आहे. आणि म्हणूनच की काय, खूप पहाणं, खूप वाचणं, आणि खूप विचार करणं, या इतकाच 'नॅचरल इन्स्टिंक्टस्' वरही त्याचा फार विश्वास आहे. ती त्याला अनेकदा उपयोगी पडत असल्याचं तो बोलून दाखवतो. 'शांतता कोर्ट' चित्रपटरूपानं आकार घेत असतानाची गोष्ट. मूळ नाटकातली शिरीष पै यांची कविता प्रसंगाला साजेशी असली तरी थोडी अधिक भावुक आहे असं त्याचं मत. तिच्या जागी चित्रपटात दुसऱ्या कवितेची योजना त्याला करायची होती. दुबे महाराष्ट्रात असला तरी अर्थात मराठी नाही. मराठीशी त्याचा संबंध या आठएक वर्षांतला. साहजिकच यासाठी इतर मराठी विद्वान् मित्रांवर त्याची भिस्त होती. पण मराठी नसला तरी मराठी, बंगाली यांसारख्या अनेक भाषांचा त्याला सुदैवानं 'कान' आहे. चि. त्र्यं. विषयी त्यांच्या काही नाटकांबाबतीत मतभेद असूनही त्याला अपार आदर. त्यामुळे या कवितेसाठी त्याने त्यांचंच नाव सुचवलं; आणि प्रा. कुमुद मेहतांना या दृष्टीने खानोलकरांच्या कविता निवडायची विनंती केली. कुमुदबेननी तशा त्या निवडलेल्या कविता त्याला दाखविल्या. आणि अचानक एका कवितेशी त्याला हा साक्षात्कार झाला. त्या कवितेची निवड त्यानं पक्की करून टाकली. पुढे त्या कवितेच्या अर्थाचे अनेक

सूक्ष्म पदर अनेकवेळा उलगडून घेतल्यावर त्याला स्वतःच्याच निवडीबद्दल पुरेपूर समाधान वाटत राहिलं.

झपाटलं जाणं हा दुबेच्या स्वभावाचा स्थायीभाव. 'शांतता, कोर्ट चालू आहे'चा अगदीं सुरुवातीचा प्रयोग दुबेनं पाहिला आणि दुबे झपाटला गेला. स्वतःच्या कानांवर त्याची नेहमीच मदार. 'रंगायन'च्या कलावंतांच्या अभिनयसामर्थ्याचीही जाणीव होतीच, कानांनी कौल दिल्यावर या नाटकाची पाहून आणि वाचून त्यानं किती पारायणं केली याला गणतीच नाही. ते नाटक आधी हिंदीत करण्याचं त्यानं मनावर घेतलं. नाटकाची मराठी प्रकृती, 'मॅनरिझम्स' कायम ठेवून त्यानं ते हिंदीत सादर केलं. मराठी न कळणाऱ्यांसाठी केवळ सोय म्हणून भाषेत फरक करण्याचा त्याचा आग्रह होता. परिणाम व्हायचा तोच झाला. नाटक (हिंदीत असून) हिंदी न वाटल्यानं अमराठी आणि मराठीत नसल्यामुळे मराठी प्रक्षकांनी प्रथम त्याला नाकं मुरडली. नाटक चक्क आपटलं. दुबे असल्या गोष्टींनी निराश होणारा नाहीच. त्यानं ते नागपूर दिल्लीला नेलं. तिथं प्रथम क्रमांकाची बक्षिसं पटकावून ते विजयी झालं. तेंडुलकर, चट्टोपाध्याय पारितोषिकाचे मानकरी झाले, नाटक बारा भाषांत अनुवादित होऊन रंगभूमीवर झळकलं. दुबेचं यानं समाधान झालं नाही. त्यानं 'शांतता'ला चित्रपटरूप देण्याचा निश्चय केला. त्या दृष्टीनं हालचाली सुरू झाल्या. बॉक्सऑफिससाठी ज्या गोष्टींकडे आवर्जून लक्ष पुरवलं जातं त्या त्यानं कटाक्षानं टाळल्या. बहुतेक पात्रं नाटकांतीलच घेतली. चित्रपट मराठीत निघाला. गाणी, नृत्य, आऊटडोअरसाठी एखादं रमणीय नेत्रसुखद स्थान, आघाडीवरच्या रूपसंपन्न तारक-तारका या सगळ्यांना फाटा देऊन चित्रपट काढला. अपेक्षेप्रमाणे बॉक्सऑफिसच्या दृष्टीनं तो ताबडतोब कोसळलाही. पण गिरीश कर्नाड, आद्य रंगाचार्य बादल सरकार, गजानन जागिरदार, ऋत्विक घटक, शंभू आणि तृप्ती मित्र आणि सत्यजित रे यासारख्या मातबरांनी दुबेची पाठ थोपटून त्याच्या यशाचं झुकतं माप त्याच्या पदरात घातलं. दुबे याचं दिग्दर्शन-कौशल्य मुक्त कंठानं वाखाणलं गेलं. अर्थात दुबेला नावं ठेवणारे टीकाकार थोडे नाहीत. किंबहुना ज्या या चित्रपटामुळे त्याला मानाचा तुरा मिळाला, मोलाचं साहाय्य झालं त्याच्या नेमक्या त्याच अंगांना विलक्षण आणि साक्षेपी समजल्या गेलेल्या महाराष्ट्रात नाकं मुरडली गेली आहेत. बेणारेचे मनोव्यापार दर्शविणारी दृश्यं किंवा सिनेमातही नाटक एकाच जागी चालू असल्याचा आभास उत्पन्न करण्यासाठी योजलेल्या क्लुप्त्या ही याची ठळक उदाहरणं. हेही रीतीला धरूनच झालं. कारण खुद्द सत्यजित रे आणि ऋत्विक घटक यांचाही सुरुवातीचा हाच अनुभव आहे. फार कशाला 'शांतता, कोर्ट चालू आहे' या नाटकाचा आणि नाटककाराचा आज अमाप गौरव होतो आहे. त्याचा पहिल्या पंचवीस प्रयोगांचा इतिहास हेच सांगतो. दुबेची उमेद टिकून आहे. चित्रपट पडल्यानं किंवा बक्षीस

मळाल्यानं त्याच्यावर फारसा परिणाम झालेला नाही. नव्या चित्रपटाच्या आणि थिएटरयुनिटसाठी नव्या नाटकाच्या जुळणीत सध्या तो गढून गेला आहे. नव्या अवघड कलावंतांना शोधून काढून, पैलू पाडून रसिकांसमोर आणण्याची त्याची साधना चालूच आहे. सुलभा देशपांडे, अमोल पालेकर या त्याच्या 'स्कूल' मधल्या कलावंतांनी आपली स्वतंत्र अस्मिता दाखवून देण्यास सुरुवात केलीच आहे. दुवेनी रंगभूमी वेगळी आहे. अधिक खरी, अधिक भेदक आहे आणि म्हणून कबूल केलं न केलं तरी अधिक जवळचीही आहे. तिचे स्वतःचे नाटककार, अभिनेते दिग्दर्शक आणि इतर तंत्रज्ञ तयार होत आले आहेत. तेजपालसारख्या आडबाजूला जाऊन ती नाटकं पहाणारा तिचा प्रेक्षकवर्गही आता निर्माण झालेला आहे. रंगायन, थिएटरयुनिट, अविष्कार, अनिकेत यांसारख्या डोळस संस्थांनी ह्या रंगभूमीची परंपरा चालवून या नव्यानं जागृत झालेल्या, नवी नजर आलेल्या प्रेक्षकांची गरज भागवणारी दर्जेदार नाटकं सतत सादर करावीत ही त्याची मनीषा आहे; आणि ती साध्य करण्यासाठी तो प्रयत्नशील आहे. यासाठी लागणारा मेहनती स्वभाव, तत्त्वनिष्ठा आणि प्रामाणिकपणा त्याच्याजवळ आहेच पण तशीच वेळ आली तर सरकारला अटी घालून त्या न पाळल्या गेल्यास सरकारची दहा हजारांची ग्रँट ठोकरून लावण्याचा ताठपणाही त्याच्याजवळ आहे. रंगभूमीवरील या उत्साही, कलंदर, मनस्वी बुद्धिमान दिग्दर्शकाची स्वप्नं साकार व्हावीत एवढीच इच्छा.

□ □ □



शरद गोखले

# रंगभूमी

## हळू बोला घोडं हासंल

**बसलेलं घोडं**

'हळू बोला घोडं हासंल' – हे राजा मयेकर पार्टीचं नवीन मुक्तनाटय. तमाशाचीचौकट संभाळून काहीतरी वेगळं देण्याचा प्रयत्न स्तुत्य असला तरी केवळ नाविन्यामुळे तमाशा प्रेक्षक आकर्षिला जाईल असे समजणे चूक आहे.

अर्थात केवळ 'नाविन्य' हे मयेकरांच्या प्रयोगाचे वैशिष्टच नाही, तर शं. ना. नवरे आणि नंदकुमार रावते ही नाटकवाली मंडळी मयेकरांनी तमाशाच्या क्षेत्रात आणली आहेत. अर्थात दोघेही तितक्याच प्रमाणात अयशस्वी झाले आहेत, हा भाग वेगळा. निवडलेल्या विषयाच्या कल्पनेचे श्रेय शं. ना. यांना दिले तरी तमाशाचे तंत्र लक्षात घेऊन त्याची मांडणी न झाल्याने कंटाळवाण्या पुनरुक्तीचा दोष सतत आढळतो. म्हणजेच तमाशाला – मुक्तनाटचाला–योग्य असा विषय आणि त्याची हाताळणी मात्र तमाशा पद्धतीला 'सूट' न हाणारी. त्यामुळे कलाकारांनी त्यांच्या परीने प्रयत्न करूनही 'तमाशा फुलणे' हा जो एक नैसर्गिक भाग असतो, त्याचा प्रत्यय तीन तासांच्या कार्यक्रमात एकदाही येत नाही. चार-दोन बारीकसारीक कोपर-खळ्या आणि थिएटरमधे बरे वाटणारे विनोद इकडे-तिकडे विखुरले आहेत, पण एवढ्या भांडवलावर 'डोलारा' उभा राहणे कठीण दिसते. त्यातही वयात आलेल्या मराठी नाटकाला दिलेली ढुशी बरी वाटते. हुका मारून बाहेर न येणारा गुरांचा डॉक्टर, गायीच्या आवाजात आरोळी मारताच हशांच्या लाटेवर आरूढ होऊन बाहेर येतो. अशा काही जागा लक्षात रहातात

इतकेच. गावाला जाणाऱ्या माणसाकडे सामान गावी पोचवण्याची विनंती करण्यासाठी येणाऱ्या मंडळींचे प्रमाण फार वाढल्याने हा सर्व भाग मुक्तनाट्याच्या, तमाशाच्या, अतिशयोक्तीच्या मर्यादा लक्षात घेऊनही फार रेंगाळल्यासारखा वाटतो.

घोड्याच्या दगडी पुतळ्याने लीद टाकणे आणि त्यावरून पुढील कथासूत्र रचणे ही कल्पना चांगली आहे. नाविन्याचा आणि वेगळ्या कल्पनेचा हा भाग सोडला, तर पूर्वार्ध आणि उत्तरार्ध हे दोन्ही भाग फार कंटाळवाणे ठरतात.

या मुक्तनाट्याचे दिग्दर्शन नंदकुमार रावते यांनी केले आहे. दिग्दर्शक म्हणून त्यांचे नाव झाले आहे म्हणूनच त्यांची दखल घ्यायची. अन्यथा नाटके दिग्दर्शित करणाऱ्या रावते यांना या नवीन प्रांतात वावरणे खचित जड गेले असेल. थोडेफार मार्गदर्शन आणि निर्मितीचा काही तपशील एवढ्या मर्यादेमध्ये रावते वावरले असावेत. दिग्दर्शक या नात्याने त्यांचे जाणवण्यासारखे अस्तित्व खचित जाणवत नाही.

## कसबी कलाकार

या क्षेत्रात प्रथमच येणाऱ्या नामवंत लेखकाचे टुकार लिखाण आणि तमाशा तंत्रामध्ये मार्गदर्शनासाठी प्रथमच उभा राहिलेला दिग्दर्शक, हे दोघेही काहीसे उजळून निघाले आहेत ते कलाकारांमुळे. राजा मयेकर – त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने प्रेक्षकांना सामोरे जातात. धोंडीबा, बाबूराव व टिकोजी अशा विविध रूपांमध्ये ते प्रेक्षकांना संतुष्ट करतात. रजनी केमकर यांना उत्तम साथ देतात. नृत्याची बाजू त्यांनी ठीक संभाळली आहे. हंसा व चंद्रा या भूमिकाही त्या खपवून घेण्याइतक्या चांगल्या करून जातात. छोट्यामोठ्या भूमिकांमध्ये सखाराम कोटकर अनंत राणे, हरिश्चंद्र कदम, रमेश पाडाव, माला केमकर हे कलाकार ठीक वाटतात.

वेगळे देण्याची कल्पना घेऊन शाहीर साबळे यांनी विजय तेंडूलकर यांचा फूटपायरीचा सम्राट मुक्तनाट्य स्वरूपात रंगभूमीवर आणला. पण हा सम्राट फूटपायरीवरच राहिला. प्रेक्षकांना भिडू शकला नाही. साबळे पार्टीशी काडीमोड घेऊन वेगळे झालेले मयेकरही वेगळेपणाच्या कल्पनेने भारावले आणि खळखळणारं खिदळणारं घोडं घेऊन आले. पण या घोड्यावरही प्रेक्षक स्वार होण्याची शक्यता नाही. तात्पर्य : वेगळं द्या – 'चालू' द्या, काय द्यायचे ते द्या, पण विचार करून द्या ! चोखंदळ प्रेक्षक वाढतो आहे.



५००० खालील वस्तीतील प्रत्येक गांवातील प्रत्येक मुलास

## डेन-टॉनिक

(टीथींग पिल्स) रुपये २–००

तसेच

## कॅल्सिटोन (टॉनिक पिल्स)

लहान मुलांकरिता : किमत रुपये ३–००

खालील जिल्ह्यात विनामूल्य द्यावयाचे आहे. तरी गरजूंनी सरपंचातर्फे किंवा केमिस्टातर्फे आम्हास कळवावे, म्हणजे औषधे पाठविण्याची व्यवस्था करू–

ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, नाशिक, जळगांव, अमरावती. धुळे, नांदेड, औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी, दौड, बुलढाणा, सातारा, यवतमाळ, वर्धा, अकोला, गोवा, कारवार, बेळगांव, चांदा, भंडारा, नागपूर व पुणे,

## होमिओ लॅबोरेटरीज्

१ ला मजला, दामोदर वालजी बिल्डिंग,

प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई–४

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

" आम्ही विजयी झालो.
आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे "

स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या पहिल्याच भाषणात
विजयोन्मादाने माओ-त्से-तुंग असे म्हणत होता.

आणि खरोखरच सारे जग हादरून गेले.
शतकानुशतकांच्या सुस्तपणानंतर
अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या
फटकाऱ्यामुळे अक्राळ-विक्राळ शक्तीचा चीन
खडबडून जागा झाला.

या चिनी
कम्युनिस्ट क्रांतीची
कथा सांगण्याचा
मराठीतला हा पहिला प्रयत्न.

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरूण साधू

राजहंस प्रकाशन : पुणे
मूल्य : चौदा रुपये